

# नवनीत

मे २००५



बालवाडीची विद्यार्थिनी ते बालवाडी शिक्षिका एक प्रवास.
समीरा आपल्या विद्यार्थिनीसह



मला मुलांना निसर्गप्रेमी बनवायचंय।

# प्रगत शिक्षण संस्था, फलटण
## वार्षिक पत्रिका

# नवनीत

मे २००५

**संपादकीय मंडळ**

प्रणिता शिंदे
दिपाली खेडकर
प्रियांका रणवरे

**संपादकीय सहाय्य**

डॉ. मंजिरी निमकर
सौ. स्वामिनी रूद्रभटे
डॉ. मॅक्सीन बर्नसन

**रेखाचित्रे**

हर्षवर्धन, प्रियांका, प्रतिक (इ.८वी)
ओंकार, विराज , गणेश (इ.७वी)
अक्षया, शितल, समीर, सृष्टी
ओमप्रकाश, नितल, अजिंक्य
विराज, स्वप्निल, मिलिंद
श्रेयस, सुरज, मधुरा (इ.५वी)
**मार्गदर्शिका :** कल्पिता दंडवते

**मुखपृष्ठ**

श्रध्दा कुलकर्णी
(दाबून सुकवलेल्या फुलांपानांची मांडणी)

**प्रकाशन :** प्रगत शिक्षण संस्था, रिंगरोड, फलटण ४१५ ५२३
**फोन :** ०२१६६-२२३०४१
**email:** pssphl@sancharnet.in
**संगणकीय अक्षरजुळणी :** प्रकाश अनभूले, कमला निंबकर बालभवन
**मुद्रण :** श्री. प्रदिप पवार, कमिन्स डिझल इंडिया प्रिंटींग युनीट
प्रगत शिक्षण संस्था, फलटण

# अनुक्रमणिका


अंकासंबंधी चार शब्द / मॅक्सीन बर्नसन / iii
प्रगत शिक्षण संस्थेवरील माहितीपट / iv
एक अविस्मरणीय सामना / सुरज चौधरी/१
वारूगडावरची चोरी/गणेश कदम/४
कष्टाची भाकर /प्रथमेश इनामदार/६
परी,झाड / श्रीरंग उंडे, करिश्मा मुल्ला /७
माझी शाळा/८
माझा शेरू / विराज तावरे /९
देव पावला / शलाका उंडे /१०
आलं अभाय,पाऊस, उमलणारी कळी / सई, जुहीना, अंकिता /११
जिवावर बेतलं पण.../प्रणाली ढमाळ/१२
फ्लिमिंगोच्या शोधात / नितल गांधी, ओमप्रकाश धुमाळ/१३
आजीबाई, ढगांची नक्षी/केतकी, प्रणाली/१५
माझे गाव / विराज गावडे /१६
शाळेची वर्गणी / आदित्य श्री. कुलकर्णी/१८
सजी दुल्हन/हर्षवर्धन, श्रध्दा/२०
क्षण एक / नम्रता मगर/२१
असे का? / निशिगंध धुमाळ/ २३
माय माय, आई / पवन, सुशांत /२४
आई, तिला आपण माता म्हणावे / अक्षय लिपारे, आदित्य अ. कुलकर्णी /२५
एकदा... / संचिता निंबाळकर /२६
केरळ प्रवास / देविका बर्गे /२९
बंद पडलेला टीव्ही / श्रध्दा कुलकर्णी /३२
मी सांगू हो सांगा, काया काया अंधारात / प्रांजली,ओमप्रकाश/ ३३
रिमिक्सचे वेड / पुजा तिटवे /३५
नगर पालिकेच्या शाळेतील मुलांची मुलाखत / प्राजक्ता पाटणकर /३६
आमचे अनुभव /अजिम मेटकरी, ओंकार शिरोळकर/३७
गरिबीतला आनंद / मोहिनी घाडगे /३९
सुरपारंब्या / पराग श्रीखंडे /४०
जेंव्हा काळ धावून येतो / हर्षवर्धन महामुलकर /४२
फुलपाखरू / शलाका उंडे / ४४
अंतराळ, अंतरीक्ष यात्री / दिपाली खेडकर, अंकिता फणसे / ४५
My Ideal Person / Pranita Shinde/46
Sketches / Standard Eight/48
My hobby / Dipali Khedkar/50
My Unforgettable Moment at School/Kranti Katkar/51
The Rainy Night / Gaurav Bhattad/52

# अंकासंबंधी चार शब्द

मागच्या "नवनीत" नंतर हा अंक बरोबर एका वर्षाने निघतो आहे ही फार समाधानकारक गोष्ट आहे. यंदाच्या अंकाची मांडणी अतिशय सुंदर व नाविन्यपूर्ण आहे. श्रध्दा कुलकर्णीचे मुखपृष्ठ व आई बद्दलच्या कवितांबरोबर असलेली रेखाचित्रे विशेष सुबक आहेत.

अंक छोटेखानी असला तरी त्यात विविधता दिसून येते— एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते, ती म्हणजे लेखनाचा अस्सलपणा. शेतात स्प्रिंकलरच्याखाली न्हाऊन घेणारी मुले, मळ्यात सूरपारंब्या खेळणारी मुले व वडापच्या संपामुळे गजबजलेल्या चौकाचे वर्णन करणारा मुलगा, ही सर्व या मातीची माणसे आहेत व ती या मातीवर अतोनात प्रेम करतात.

अर्थात खेड्यातले—वा गावातले—जीवन नेहमीच मजेशीर असते, अशातला भाग नाही, याची आठवण करून देणाऱ्या "जिवावर बेतलं पण" व "एकदा" या गोष्टी आहेत. साध्या वाटणाऱ्या गोष्टीतही अपघाताचा किंवा मृत्यूचा धोका असतो याचीही जाणीव मुलांना आहे.

वयक्तिक अनुभवाच्या पलिकडे जाऊन मुलांना सामाजिक वास्तव शोधण्याची क्षमता आहे, हे विशेषतः नगर परिषद शाळेला दिलेल्या भेटीबद्दलच्या लेखांमध्ये दिसते.

काही मुलांच्या मनातील विश्व स्वतःच्या गावापेक्षा बरेच विस्तृत आहे, हे "जेव्हा काळ धावून येतो" या हर्षवर्धनच्या गोष्टीमध्ये दिसून येते.

विनोदी अनुभव कथनामध्ये सूरजचा "एक अविस्मरयणीय सामना" विशेष उल्लेखनीय आहे. लेखन सफाईदार आहे व अधूनमधून नेमकी हिंदी वाक्ये वापरून स्वतःची खिल्ली उडवण्याचे कौशल्य (व प्रगल्भता) त्याने दाखवली आहे.

एका बाजूला मुलांचे कमी-अधिक वस्तुनिष्ठ लेखन असून दुसऱ्या बाजूला इ. दुसरीतील प्रथमेशची "कष्टाची भाकर" ही गोष्ट लोककलेचा बाज असलेली व मनाला भिडणारी आहे.

अंकिताची "उमलणारी कळी" व प्रणालीची "ढगाची नक्षी" या कविता नाजूक व सुंदर आहेत. आदित्यच्या "तिला आपण माता म्हणावे" या कवितेमध्ये उत्कट भावना दिसून येते.

या अंकात पहिल्यांदाच मराठी, इंग्रजी, हिंदी या तीनही भाषांमधले लेखन समाविष्ट झाले आहे. शाहीनचे "भैंस" हे अनुभवकथन चांगलेच मजेशीर आहे. प्रणिताने आजीबद्दल लिहिलेला लेख फार प्रभावी आहे. न खचता स्वतःच्या मोठ्या मुलाचा मृत्यू स्वीकारून, "हा निसर्गाचा नियम" म्हणणारी आजी हे स्थितप्रज्ञेचे जिवंत उदाहरण आहे.

या अंकाचा खर्च अजिता काळे स्मरणार्थ निधीतून निघाला आहे. त्याबद्दल आम्ही डॉ. अशोक काळे यांचे आभारी आहोत. मनाला वाटते की मुलांचे कौतुक करण्यासाठी अजिता असायला हवी होती. असो.

**मॅक्सीन बर्नसन**

# प्रगत शिक्षण संस्थेवरील माहितीपट

प्रगत शिक्षण संस्थेचे काम सुरू झाल्याला २५ वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्ताने संस्थेची सुरुवात, काम, तत्वप्रणाली इत्यादींची माहिती देणारा एक लहानसा माहितीपट तयार करण्याचे ठरले.

हा संस्थेवरील माहितीपट तयार करण्याचे आव्हान स्वीकारले वसीमने. वसीम मणेर हा कमला निंबकर बालभवनच्या पहिल्या १० वीच्या बॅचचा विद्यार्थी. वसीमने कमला निंबकर बालभवनमध्येच कलाशिक्षक म्हणूनही काही वर्षे काम केलेले होते. त्यामुळे संस्थेच्या कामाची माहिती तर होतीच पण संस्था व त्यातील माणसांबद्दल आत्मीयताही होती. त्याने संस्थेशी संबंधित अनेकांच्या मुलाखती घेऊन स्क्रिप्ट तयार केले.




निंबकर ॲग्रिकल्चरल रिसर्च इन्स्टिट्यूटच्या ॲनिमल हजबंडरी विभागाने आपला व्हिडिओ कॅमेरा विनामूल्य वापरायला दिला.

कमला निंबकर बालभवनच्या बाल-चमूच्या मदतीने जवळजवळ सहा तासांचे शूटिंग केले. संकलनाची जबाबदारी श्रीडिजिटलच्या श्री. अशोक नाळे यांनी पेलली. नीलमताईंनी आवाज दिला आणि केवळ बारा हजार रूपयांत अर्ध्या तासाचा माहितीपट तयार झाला.

आज हा माहितीपट जगाच्या कानाकोपऱ्यात पोचला आहे.

# एक अविस्मरणीय सामना

सूरज चौधरी

इयत्ता ९ वी

ही गोष्ट आहे मागच्या उन्हाळ्याच्या सुट्टीतील. उन्हाळ्याची सुट्टी म्हणजे एकतर सगळीकडे गरमी, ऊन. पण आमच्यासारखी गरम रक्ताची व क्रिकेट ज्वर चढलेली मुले भरदिवसा उन्हातान्हात क्रिकेट खेळत बसतात. तसेच अनेक क्रिकेटच्या मॅचेसही असतात. यातील प्रत्येक मॅचमध्ये आम्हा मुलांच्या दृष्टीने आमचा संघ भारत विरुध्द पाकिस्तान आहे. आपण हरलो तर आपल्या संघाची लाज धुळीस मिळणार.

आम्हाला नुकतीच सुट्टी लागलेली आणि आम्ही वर्गातील सर्व मुले दुपारच्या रखरखत्या उन्हात न्हाऊन तप्त झालेल्या मैदानावर (आमच्या गावातील विमानतळावर) क्रिकेट खेळत होतो. अचानक थोडासा पावसाचा शिंतोडा पडावा तसे आमच्या घामाचे शिंतोडे पडत होते. परीक्षेच्या, अभ्यासाच्या कचाट्यातून सुटून आल्यावर आम्हाला १०-२० वर्षे पाकिस्तानी जेलमध्ये राहिल्यानंतर सुटून आल्यासारखे वाटत होते. आम्ही खेळत असताना दुसऱ्या शाळेच्या मुलांचा संघ मैदानावर आला आणि त्यांनी आमच्यामोर मॅचचा प्रस्ताव ठेवला. आमच्यात बरीच चर्चा झाल्यानंतर आम्ही आमच्यातील निपुण अशा आठ खेळाडूंचा संघ निवडला व इतर मुले राखीव गडी कम प्रेक्षक म्हणून नियोजित बाऊंडरी लाईनच्या पलिकडे बसलो. आमच्या संघाचा कप्तान म्हणून माझे नाव घोषित झाले. मॅच ११ रु. ची ठरली.


अनेक शिट्या, टाळ्या आणि प्रोत्साहनाच्या घोषात मी ऐटीत टॉस उडवण्यासाठी गेलो आणि क्षणातच टॉस हरल्यानंतर माझे सर्व मित्र शांत झाले. नको असतानाही आम्हाला प्रथम बॉलिंग आली आणि मी फील्डिंग लावण्यात मग्न झालो. काही क्षणांतच आमचा ओपनिंग बॉलर बॉल घेऊन थांबला. आमच्या गटात प्रोत्साहनाच्या घोषणा वादळासारख्या उठू लागल्या. त्या निर्जन मैदानावर आमचाच आवाज मधमाशांच्या घों घों सारखा येत होता.

आमचा गोलंदाज जसा रन्अप घेत पळत येत होता तसा कालवा वाढत होता. त्याच्या हातातून बॉल सुटल्यावर क्षणभर सर्वांनी श्वास रोखला. तो आमच्यातला सर्वात उत्तम गोलंदाज होता. पण पहिल्याच बॉलवर फोर गेला आणि पळभर आम्ही सर्व नाराज झालो. पण पुन्हा त्याला प्रोत्साहन देऊ लागलो आणि अपेक्षेप्रमाणे त्याने तिसऱ्या बॉलवर समोरच्याचा त्रिफळा उडवला आणि नंतर दुसऱ्याच बॉलवर अजून एकाला बळीचा बकरा बनवत कीपरकडे झेल द्यायला लावून आऊट केला. पण नंतरच्या काही ओव्हर्स आमच्यासाठी निराशाजनक ठरल्या. त्यांचा स्कोअर ८ ओव्हर ६०रन एवढा झाला. मग पुढच्या ओव्हरवर आमच्यातल्या दुसऱ्या एका गोलंदाजाने सलग तीन त्रिफळे उडवून हॅट्ट्रिक तर केलीच पण विरोधी संघाला जोर का झटका धीरेसे दिला. नंतर पुन्हा विकेटा घेण्यात आम्ही अपयशी ठरलो आणि १५ ओव्हरच्या अखेरीस त्यांनी १०५ रन्स् बनवल्या व आता आमची बॅटिंगची वेळ होती.

मी आमच्या टीमचा ओपनिंग बॅट्स्मन होतो. एखादा वीर सरदार चकचकती तलवार घेऊन रणात उतरावा तसा मी ग्राऊंडवर दाखल झालो. माझ्या सहकाऱ्याला काही टेन्शन घेऊ नको असे सांगून आलो. पण खरंतर माझ्यावर खूप दडपण होतं. आणि तशातच मी बॅटिंगला उभा राहिलो व माझ्या समोर विरोधी संघाचा बॉलर होता.एखादा लढाऊ बैल नाकातून फुसकारा सोडत, खुरांनी मागे माती उधळत यावा तसा तो आला. सर्वजण मला प्रोत्साहन देत होते. मी तो त्याचा रनअप बघून घाबरलो होतो. क्षणभर तर मला शोएब अख्तरचीच आठवण झाली. पण मी तो वेगवान चेंडू पिटाळून काढला. मात्र एकही रन काढू शकलो नाही. कोणीतरी आपल्याला गोळी मारलेली आहे पण आपण आपले शस्त्र आडवे घालून वाचल्यासारखे वाटले. नंतर मी एक रन काढून आपला बचाव केला; पण नंतर आमच्या दोन विकेट गेल्या. तरीही खेळाला आवरत मी व तिसऱ्या गड्याने ३२ धावांची भागीदारी करीत आमचा स्कोअर ६ व्या ओव्हर अखेरीस ४५ पर्यंत नेला. नंतर त्याच बैलाने (म्हणजे विरोधी संघाच्या बॉलरने) हॅट्ट्रीक केली आणि आमची स्थिती ७ व्या ओव्हरच्या अखेरीस ४७ वर ५ आऊट अशी झाली. नंतर तरीही मी आणि माझ्या

सहकाऱ्याने फिरकी गोलंदाजाचा चांगलाच समाचार घेतला. आता स्कोअर १२ओव्हर अखेरीस ९५ पर्यंत नेला. पण नंतरच्या फास्ट बॉलरच्या दोन ओव्हर्समध्ये आम्ही फक्त दोनच रन केल्या आणि त्याबरोबर दोन विकेटही गमावल्या. आता शेवटची ओव्हर होती. आम्हाला जिंकण्यासाठी ८ रन्स्ची गरज होती. हारने वालेकी इज्जत का सवाल था आणि माझ्यासमोर तोच बैल उभा होता. त्याच्या पहिल्या बॉलला मी १ रन काढली. आता आम्हाला ५ बॉल ७ रन हव्या होत्या. माझ्या सहकाऱ्याने दुसरा बॉल सोडला. आमच्या टीममधले सगळे त्याच्यावर नाराज झाले पण नंतर त्याने तिसऱ्या बॉलवर एक रन काढली. आता आम्हाला जिंकण्यासाठी ३ बॉल ६ रन्स हव्या होत्या आणि शेवटचीच विकेट होती. मला तर त्या बॉलची भीती वाटत होती. तशातच मी दोन बॉल सोडले. सगळे मित्र मला शिव्या देत होते. आता शेवटचा बॉल होता आणि सिक्स हवा होता. माझ्या सगळ्या मित्रांनी अपेक्षा सोडलेल्या आणि तेव्हा दुपारच्या ३-४ च्या उन्हात मी पूर्णपणे घामाघूम झालो होतो. मैदानावर वावटळ उठलेली. अशातच त्या बैलाने समोरून गोळी सारखा बॉल टाकला. पण नशीबाने तो बॉल वाईड पडला. मला अजून एक संधी मिळाली. मी मित्रांकडे बघितले सर्वजण उत्सुक होते.

**(पान २० वर)**



# वारूगडावरची चोरी

## गणेश कदम


इयत्ता ७ वी

गिरवी हे माझे मूळगाव. मी तुम्हाला काही सांगण्यापूर्वी गिरवीची माहिती देतो. गिरवीत एक मोठा चौक आहे. या चौकात वडाप बंदमुळे बंद पडलेल्या जीपगाड्या व त्यांचे बेकार ड्रायव्हर. एका झाडाखाली म्हातारी माणसे राजकारणाविषयी बोलत बसलेली. चौथऱ्यावर पत्त्यांचा डाव चाललेला. पोरं इकडून तिकडे पळत आहेत, खेळत आहेत. असे आमचे गिरवी गाव.

नुकतीच उन्हाळ्याची सुट्टी लागली होती. मी गिरवीला गेलो होतो. नेहमी गजबजणारी गिरवी आज सुनी सुनी वाटत होती. मी घरी आलो व कारण विचारले. कारण फारच गंभीर होते. सारे वातावरण भयभीत झाले होते. कारण गावात दरोडेखोर आला होता. त्याचे नाव तात्या दरोडेखोर. आम्ही तीन-चार दिवस घरीच होतो. उठता-बसता तात्या दरोडेखोर. भीतीने झोप येईना.

सात-आठ दिवस गेले. वातावरण पूर्वीसारखे होऊ लागले. गाव गजबजू लागले. आम्ही शेतात फिरायला जायला निघालो. आमच्या गँगमध्ये मी, माझे भाऊ सुरज, दिग्विजय, माझ्या बहिणी सायली, गौरी व आरती हे होते. आम्ही शेतात गेलो. शेतातील डाळिंबे काढली. ती खाल्ली. तेथे खेळलो. भरपूर मजा केली व थोडावेळ विश्रांती घेतल्यानंतर आम्ही परतीच्या मार्गाला निघालो. आम्हाला कुणालाच जावेसे वाटत नव्हते. "आपण वारूगडावर जायचे का?", मी विचारले. सर्वांनी मला वेड्यात काढले. पण शेवटी सर्वांना जावेसे वाटत होते. आम्ही वेगाने गड चढत होतो. गड चढण्याची जणू शर्यतच लागली होती. गड चढताना खूप दम लागत होता. आम्ही गडाच्या निम्म्यात आलो. गडाच्या निम्म्यात पठार आहे. तेथे एक मंदिर आहे. आम्ही थोडी विश्रांती घेतली व दर्शनाला निघालो. तेथे जाऊन बघतो तर काय तात्या दरोडेखोर त्या पुजाऱ्याला धमकावून देवाचे दागिने पळवत होता. ते पाहताच आमच्या

तोंडचे पाणी पळाले. आमची बोबडीच वळली. आम्ही पळत एका झाडाखाली आलो. गौरी आमच्यावर नेहमीप्रमाणे ओरडू लागली. मला समजले आता भांडून चालणार नाही. मी सुरजला आमच्या शेतात जाऊन काकांना बोलवायला सांगितले व आम्ही पुजाऱ्याच्या घरी आलो. तेथे आम्ही दोरखंड मागितले व परत त्याच झाडाखाली आलो. दिग्विजयला झाडावर चढवले व असा सापळा रचला की चोराचे पाय त्यात अडकतील. मी परत देवळात गेलो. मग मी मुद्दामच किंचाळलो. तो दरोडेखोर माझ्या मागे लागला. तेवढ्यात मी जवळचे कुंकू उचलले व त्याच्या डोळ्यात टाकले. तो आणखीनच चिडला व वेड्यासारखा ओरडत माझ्या मागे लागला. मी सापळ्यापाशी आलो व थांबलो. तात्याच्या व माझ्या मधे तो सापळा होता. तात्या सापळ्यावर आला. तेवढ्यात दिग्विजयने दोर ओढला. तात्या सापळ्यात पुरा फसला. आता आमच्या जिवात जीव आला. आम्ही तात्याला हसू लागलो. त्याची चेष्टा करू लागलो. तेवढ्यात दोरच तुटला व तात्या सुटला. त्याला राग आला होता व तो आम्हाला पकडू लागला. आम्ही सैरावैरा पळू लागलो. शेवटी मी तात्याला सापडलो. माझी स्थिती सापळ्यात अडकलेल्या **(पान ३९ वर)**



# कष्टाची भाकर

## प्रथमेश इनामदार

इयत्ता २ री

एक लक्ष्मण नावाचा गरीब, कष्टाळू आणि सत्यवचनी माणूस होता. त्याचे लग्न झाले होते. ते दोघे नवराबायको व त्याचे म्हातारे आई वडील असे चौघेजण गुऱ्हाळ चालवून पोटापुरता पैसा मिळवीत. एक दिवस लक्ष्मण सकाळी आपल्या गुऱ्हाळात बसला असताना एक पोस्टमन शेजारच्या एका दुकानाचा पत्ता विचारत लक्ष्मणाच्या गुऱ्हाळात आला. लक्ष्मण दिवसभर कष्ट करून दमलेला होता आणि तो पोस्टमन फिरून दमलेला होतो म्हणून लक्ष्मण त्याला म्हणाला की ते दुकान आपल्या गुऱ्हाळापासून बरेच लांब आहे. तुम्ही थोडा वेळ विसावा घ्या, रस घ्या मग पुढे जा. लक्ष्मणने त्याला रस दिला. रस पिता पिता दोघांच्याही गप्पा रंगल्या. पोस्टमनने त्याला एक मौल्यवान माहिती दिली. त्याने त्याला एका अरण्याबद्दलची माहिती सांगितली. ती अशी. महाराष्ट्राच्या दक्षिणेला एक अरण्य आहे. त्या अरण्याच्या वाटेवरच एक देऊळ आहे. तेथे मोठे, मोठे महात्मे व स्वामी आहेत. त्यांचे दर्शन घेऊन पुढे जा. थोड्या अंतरावरच तुला ते अरण्य दिसेल. अरण्यात प्रवेश केल्यावर तुला एक तळे दिसेल. त्या तळ्यात दोन कमळे आहेत. त्यातले कुठलेही एक कमळ घेऊन तू परत ये. पण त्या कमळांच्या संरक्षणासाठी तिथे अस्वल आणि कोल्हा हे दोन प्राणी आहेत. त्यांना चुकवून तुला ते कमळ आणावे लागेल.

लक्ष्मण दोन दिवसांची शिदोरी घेऊन अरण्याकडे जाण्यास निघाला. वाटेत त्याला सांगितल्याप्रमाणे देऊळ दिसले. तो तेथील संतांच्या पाया पडला. पुढे त्याला ते तळे दिसले. अस्वलांना चुकवून त्याने ते कमळ मिळविले व तो आपल्या घरी आला. त्याने ते कमळ देवापुढे ठेवले. ते कमळ आणल्यापासून तो सुखी झाला. काही दिवस सुखाचे गेले पण त्याला असले सुख पटेना. तेव्हा त्याने ते कमळ परत करायचे ठरवले व ते कमळ घेऊन तो निघाला.ते कमळ त्याने अरण्यात सोडले व तो पुन्हा आपल्या व्यवसायाकडे वळला आणि कष्टाने कमवू लागला. ■

## परी

एक होती परी
तिला सापडली दोरी
दोरी बांधली खांबाला
लागली वर चढायला
दोरी तुटली खचकन
परी पडली धपकन
परी लागली रडायला
चांदोबा लागला हसायला
परी म्हणाली आरगट्टी-बारगट्टी
चांदोबाशी कधी बोलायचं नाही
वरती कधी जायचं नाही.

**श्रीरंग उंडे**
इयत्ता ३री

## झाड

एक झाड तोडा आणि
चार झाडे लावा
चार झाडे लावा आणि
चार झाडे जगवा
दोन फळे खा आणि
आठ बिया लावा
आठ बिया लावा
त्या बियांना जगवा
त्या बियांना वाढवा
त्यांची फळे खावा
त्या बिया पुन्हा लावा.

**करिश्मा मुल्ला**
इयत्ता ६ वी

# माझी शाळा

## चित्रे व कल्पना

### इयत्ता १ली



मुले शाळेत येण्यासाठी मी काय करणार?
रडली तर जवळ घेणार. नीट शिकवणार.
फिरायला नेणार. रोज खेळायला सोडणार.




मला झाडाखाली वर्ग आवडतो.
झाडाची पाने डोक्यावर पडतात
त्यामुळे मजा येते.

# माझा शेरू

विराज तावरे

इयत्ता ५ वी

मी आणि मम्मी उन्हाळ्याच्या सुट्टीत भोपाळला गेलो. आम्ही स्टेशनवर पोहोचलो. मामा तेथे आला होता. मामाची स्कूटर बाहेर होती. आम्ही स्कूटरवर बसून घरी गेलो. बाहेर स्कूटर थांबवली. मामाच्या स्कूटरचा आवाज आला की एका काळ्या कुत्र्याने खिडकीतून मान बाहेर काढून भो भो आवाज काढला. मी सामान घेऊन मम्मीचा पदर पकडून आत गेलो. तर लांडग्याएवढा कुत्रा दारात उभा होता. मामीने त्याला पकडले होते. तो आम्हाला आत येऊ देत नव्हता. मी आणि मम्मी पुढच्या हॉलमध्ये बसलो. तर त्याने माझी चड्डी ओढली आणि भो भो केले. मी घाबरलो. मी मम्मीला म्हटले मला फलटणला जायचंय. मी रडलो. शेवटी आजी म्हणली हे घे बिस्कीट आणि शेरूला दे. मी त्याला बिस्किट द्यायला गेलो. त्याने राक्षसा एवढा जबडा उघडला. मी ते बिस्किट उंच फेकले आणि पळत जाऊन मम्मीच्या पदरात लपलो व तो बिस्किट कसे खातो ते बघितले. जेव्हा मी ते बिस्किट वर फेकले तेव्हा त्याने ते उडी मारून खाल्ले. मग तो शेपूट हालवून माझा मित्र बनला. मी त्याला रोज बिस्किटे द्यायला लागलो व त्याच्या बरोबर चेंडू खेळायला लागलो.



दहा-बारा दिवसांनी आम्ही फलटणला यायला निघालो तेव्हा मला शेरूला बाय करताना रडू येत होते. मी खूप रडलो व खेळायला आणलेला बॉल शेरूला भेट दिला. अजूनही फोन केला तर शेरू फोनवर भो s भो s करतो आणि मला म्हणतो तू इकडे ये.

■

# देव पावला

शलाका उंडे

इयत्ता ६ वी

एक गाव होतं. तेथील सर्व माणसे गुण्यागोविंदाने रहात असत. पण ती माणसे वृक्षतोड खूप करीत, पाण्याचा सुद्धा खूप जास्ती वापर करीत.

एके दिवशी असे करता करता त्या गावातली सर्व झाडे संपली, जमिनीखालचा पाण्याचा साठाही संपू लागला. असे करताना एके दिवशी दुष्काळ पडला. गुरांना खायला मिळत नव्हते. प्यायला पाणी मिळत नव्हते. माणसांनी आपल्या जमिनी व गायी गुरे विकून टाकली. माणसे भरभर गाव सोडून जाऊ लागली.

त्या गावात एक ब्राम्हण रहात होता. त्याने देवाची तपश्चर्या केली. न खाता पिता त्याने खूप दिवस काढले त्याची तपश्चर्या देवाने ऐकली व देव प्रसन्न झाला.

ब्राम्हणाने देवाला सांगितले की आमच्या गावात दुष्काळ पडला आहे. आमच्या गावातला दुष्काळ घालवा. देव म्हणाले की मी काही उपाय करू शकत नाही. तुम्हीच सर्व झाडे तोडली. पाण्याचा कसाही वापर केला. म्हणून दुष्काळ पडला. आता तुम्हीच झाडे लावा आणि काय ते बघा. असे म्हणून देव अदृश्य झाले.

तो माणूस घरी गेला व गावात सर्वांना सांगितले. मग सर्वांनी झाडे लावली. पाण्याचा काटकसरीने वापर केला. झाडे वाढल्याने हवेत गारवा वाढला, थंड हवा ढगांना लागली व पाऊस पडला. मग सर्वांनी परत बैल खरेदी केले जमिनी नांगरल्या. पिके पेरली. जमिनीत भरघोस पीक उगवले मग त्या गावातला दुष्काळ नाहीसा झाला.

■

## आलं आभाय

आले आभाय भरीसन
आला पाऊस जोरानं
गेला भिजून शेत
दाणे भरीसन कणसांत
हिरवी गार सगयी रान
मन आनंदाने गेलं भरीसन

**सई भोसले**
इयत्ता ५ वी

## पाऊस

पावसा पावसा ये ये ये
पीक पाणी दे दे दे
धारा पडू दे भर भर भर
जमीन भिजू दे सर सर सर
बी रुजू दे झर झर झर
कोंब फुटू दे तर तर तर
झाड वाढू दे फर फर फर
दाणा भरू दे गर गर गर
पीक पिकू दे भस भस भस
ओला चारा खस खस खस
गाई-गुरांचे पोट भरो भर भर भर
आनंदी आनंद फार फार फार.

**जुहीना बागवान**
इयत्ता ७ वी

## उमलणारी कळी

पहाटेच्या रम्य सकाळी
मला जाग आली
हळूच पाहिले डोकावून
तर दिसली एक परी
हसत होती डोलत होती
वाऱ्याच्या झोताने
जवळ जाऊन पाहिले
तर उमलणारी कळी

**अंकिता फणसे**
इयत्ता ७ वी



# जिवावर बेतलं पण ...

प्रणाली ढमाळ

इयत्ता ७ वी

तीन चार वर्षांपूर्वीची ही घटना आहे. नुकतीच शाळा सुटली होती आणि मी घरी चालले होते.दुपारची वेळ होती. तेव्हा मी सकाळच्या शाळेत होते. मी हळू हळू रस्त्याच्या कडेने, सावलीतून चालत होते. थोड्या वेळातच मी घरी पोहोचले. हातपाय धवून मी माझ्या मामाच्या मुलीला घेऊन बसले. ती एक-दीड वर्षाची होती. मी तिला लाडाने चिनू म्हणून हाक मारायची. तिला घेऊन मी शेजारच्या आशिर्वादकडे खेळायला गेले आणि त्याच्या बाबांच्या रिक्षात बसले. आम्ही रिक्षावाले रिक्षावाले खेळत होतो. ती रिक्षा घराच्या समोर झाडाखाली लावली होती. झाडाच्या कडेला एक गटार होते. मी रिक्षात पाठीमागे चिनूला घेऊन बसले होते आणि आशिर्वाद रिक्षा चालवायचं सोंग करीत होता. तो मधूनच पों पों करायचा आणि तोंडानं गाडीचा आवाज करायचा. मी त्याच्याशी बोलत असताना अचानक चिनू माझ्या हातातून निसटली व गडगडत गटारात जाऊन पडली. मी खूप घाबरले. माझ्याबरोबर आशिर्वादही घाबरला. मी त्याला सांगितले तू कोणाला काही सांगू नकोस. मी दबकत दबकत मामीकडे गेले आणि रडक्या स्वरात मामी मामी अशी हाक मारली. मामी बाहेर आल्या आणि बघतात तर काय चिनूचे सगळे कपडे घाण झालेले. मामीचे डोळे रागाने लालबुंद झालेले होते. मामीनी चिनूला घेतले व गरम पाण्याने आंघोळ घातली. मी मामीला सांगितले की मी गटरात पडले. मामी रागावल्या नाहीत. पण आजी फार रागावली. नंतर मी आजोबांना सगळे खरे खरे सांगितले. ते म्हणाले तू आईला काही सांगू नकोस नाहीतर ती मारेल. मी अजूनही आईला काही सांगितले नाही.

■

# फ्लेमिंगोंच्या शोधात

नितल गांधी, ओमप्रकाश धुमाळ

इयत्ता ५ वी

आम्ही सर्वांनी रविवारी मायणीला जायचे ठरवले. सकाळी साडे सहाच्या सुमारास आम्ही सर्वजण शाळेत जमलो. मंजूताई, कल्पिताताई, समीराताई, तिचे बाबा, आवटी आजोबा आणि शेखकाका येणार होते.

सर्वजण गाडीत बसलो. आम्ही फ्लेमिंगो पहायला मायणीला निघालो होतो. पक्षी तेथे असतील का? आम्हाला दिसतील का? ते कसे दिसत असतील? किती असतील? असे अनेक प्रश्न आमच्या समोर येत होते. मोगराळे घाटातून जाताना पेंटेड पार्टरिज (तितर) दिसले. पुढे जाताना कबुतरे, कोतवाल, चंडोल, कापशी असे अनेक पक्षी बघितले. आम्ही त्यांची नोंद आमच्या नोंदवहीत करत होतो. काही वेळाने आम्ही मायणीला पोहोचलो.तिथल्या तलावाच्या दिशेने आम्ही निघालो. त्या तलावाशेजारीच एक मचाणही होते. आम्हाला तलावाच्या कडेला घोटाभर पाण्यात कूट, शेकाट्या, इग्रेट वगैरे पक्षी दिसले. पुढे बंधाऱ्यावरून जाताना आम्हाला ग्रे-हेरॉन, पर्पल हेरॉन, मोठे बगळे, टिटव्या हे पाणपक्षी दिसले तर मार्श हॅरिअर हा शिकारी पक्षी देखील पहायला मिळाला. त्या बंधाऱ्या-शेजारचे एक झाड कोणी कोरल्याप्रमाणे दिसत होते.

खूप सारे पक्षी पहायला मिळत होते पण खरेतर आम्ही खास फ्लेमिंगो पहायला गेलो होतो पण फ्लेमिंगो कुठेच दिसत नव्हते. मंजूताईंनी फॉरेस्ट गार्डला विचारले की इथले फ्लेमिंगो कुठे गेले? तेव्हा समजले की गेल्या आठवड्यात कॉलेजची मुले आली होती. त्यांनी आरडा ओरडा करून, फटाके वाजवून फ्लेमिंगोंना उडवून लावले. ते आता राजेवाडीच्या तलावात गेले आहेत.लगेच आम्ही राजेवाडीला जायचे ठरवले.

जाताना ढाकणीच्या तलावात चक्रवाक पहायला मिळाले. म्हसवड, देवापूर मागे पडले. राजेवाडीकडे जाणारा रस्ता पूर्णपणे कच्चा आहे. धुळीतून कच्च्या रस्त्याने गेल्यावर पुढे मोठा तलाव दिसत होता.

दूरवरून आम्हाला पांढरे पांढरे शेकडो पक्षी दिसले. ते फ्लेमिंगो आहेत असे समीराताई म्हणाली. पण खात्री करून घेण्यासाठी आम्ही दुर्बिणीतून पाहिले. ते खूपच दूर होते. त्यांना नीट बघण्यासाठी आम्ही तलावाच्या दिशेने चालू लागलो. धुळीने भरलेल्या सपाट माळावरून चालल्यावर आम्हाला दलदल लागली. आता फ्लेमिंगो दिसेनासे झाले कारण दलदलीपलीकडे एक टेकाड होते व फ्लेमिंगो



त्या टेकडाच्या पलिकडे होते.

काहीही झाले तरी फ्लेमिंगो पहायचेच पण त्यांच्यापर्यंत पोचायचे कसे हा प्रश्न होता. हा प्रश्न शेखकाकांनी सोडविला. पायातील बूट, सॉक्स काढून पॅन्ट गुडघ्यापर्यंत गुंडाळून आम्ही शेखकाकांच्या मागे चिखलातून चालू लागलो. चालताना कुणी घसरत होते तर कुणाच्या पायाला चिखलातील काटे-कुटे लागत होते. एकमेकांचा हात धरून साखळी करून आम्ही भीत भीतच चालत होतो. शेवटी त्या टेकडीपर्यंत पोचलो.

एकमेकांना सहकार्य करीत आणि बिल्कूल आवाज न करता आम्ही टेकडीवर जाऊन बसलो. तेव्हा आमचा आनंद गगनात मावेना. समोरच दीड दोनशे फ्लेमिंगोंचा थवा पाण्यात उभा होता. लांब-बाकदार मान, बाकदार लालसर चोच, शुभ्र व गुलाबी रंगाचे फ्लेमिंगो फारच देखणे दिसत होते. तेवढ्यात समोरून मोठ्याने गाणे म्हणत आलेल्या माणसांची चाहूल लागून तो थवा उडाला, तेव्हा आकाशातही

पांढऱ्या गुलाबी रंगाचा ढग उडताना दिसला. सऽऽसऽऽ आऽऽऽ असा आवाज सगळ्यांच्या तोंडून निघाला आणि दूरवर उडणाऱ्या पक्ष्यांकडे आम्ही पहातच राहिलो. आता सर्व काही आमच्या मनासारखे झाले होते. आणखी आनंदाची गोष्ट म्हणजे मुलांना फ्लेमिंगोची पिसेही मिळाली होती. तहान भूक विसरून फ्लेमिंगोच्या शोधात निघालेल्या आमच्या अविस्मरणीय प्रयत्नांचे सार्थक झाले होते. ■

## आजीबाई

एक होत्या आजीबाई
त्या होत्या भांडखोर फार
एके दिवशी त्यांच्याकडे
आले पाहुणे चार
आजीबाई भांडल्या
त्यांच्याशी फार
पाहुणे गेले निघून
आजीबाई बसल्या रुसून
शेजारी म्हणाले हसून
आता काय उपयोग रुसून

**केतकी महेश बोरावके**
इयत्ता ६ वी



## ढगांची नक्षी

करमेना घरात म्हणून गेले गच्चीवर
अभ्यासाला घेतलं लागत नाही मन
वर पहिले आकाशात
दिसले सुंदर पक्षी
ते करत होते ढगांची नक्षी
अचानक नजर एकदम झुकली
ढगांची नक्षी पटकन चुकली.

**प्रणाली ढमाळ**
इयत्ता ७ वी

# माझे गाव

## विराज गावडे

इयत्ता ७ वी

जेथे तेथे नावाबरोबर विचारले जाते, ते म्हणजे गाव."तुमचे नाव काय? तुमचे गाव कोणते?" जेथे तेथे हा प्रश्न केला जातो. अगदी नोकरी लागायच्या आधी इंटरव्ह्यू वेळीही हे प्रश्न केले जातात. मला जेव्हा कोणी हे प्रश्न करतो तेव्हा ज्या अभिमानानं मी माझे नाव सांगतो तेवढ्याच अभिमानाने मी माझे गाव पवारवाडी असे सांगतो. जरी ते खेडे असले तरी मी गावाचे नाव सांगताना कमी-पणा वाटून घेत नाही.

माझे गाव सातारा जिल्ह्यात फलटण तालुक्यात आहे. या गावात शेती केली जाते. पवारवाडीच्या चारही बाजू हिरव्या रानाने वेढलेल्या आहेत.

माझ्याही घरी शेती केली जाते. ऊस, ज्वारी, बाजरी, मका, वांगी अशी नाना प्रकारची पिके घेतली जातात. तेथे ठिबक सिंचन, तुषार सिंचन यांच्या आधारावर शेती होते. तुषार सिंचनाद्वारे कमी पाण्याचा चांगला वापर केला जातो. तुषार सिंचन चालू असताना त्यात भिजताना वाटते जणू आत्ता पाऊसच पडतो आहे.

एक दिवस मी आणि माझे मित्र शेतात स्प्रिंकलर पहायला गेलो होतो. समोर पाणी कारंजासारखे उडत होते. मावळत्या सूर्य किरणात असे वाटत होते की जणू सोने उधळले जात आहे. मुलांची सर्वात आवडती गोष्ट म्हणजे पाण्यात खेळणे. मग ते कोठे का असेना. समोर पाणी उडत आहे आणि आम्ही बघत बसलोय असे कसे होईल? कोणी ना कोणी काहीतरी कारण काढायचेच आणि पाण्यात भिजायचेच. थोड्या वेळाने आमच्यात चिखलाच्या गोळ्यांनी मारामारी सुरू झाली. आता एकदा रंगलेल्या खेळात कसले कपडे मळले आणि कसले पिकाचे नुकसान. थोड्या वेळाने त्या बांधाने दत्तूकाका पळत आला तेव्हा मात्र सर्वांची गडबड उडाली. सर्वांची एकच क्रिया चालू होती ती म्हणजे धावण्याची. सर्वजण आपापल्या मार्गाने पळू लागले. नंतर सगळ्यांची

भेट झाली ती थेट घरीच. सर्वजण हसत आणि धापा टाकीत होते.

असे आमचे गमतीदार गाव. संकटकाळी वाऱ्यासारखे धावून येणारे मित्र.असे गाव तुम्हाला तरी सोडून जाऊ वाटेल काय? मलाही नाही जाऊ वाटत. पण काय करणार? शाळेला तर जायचेच असते. त्यासाठी फलटणला रहायचे असते. असे हे गाव ज्याचे कितीही वर्णन कराल तेवढे कमीच. आनंदाच्या सागरात डुंबणारे असे माझे गाव आहे. ■



# शाळेची वर्गणी

## आदित्य श्री.कुलकर्णी

इयत्ता ८ वी

मारुतीच्या देवळासमोर पारावर चार माणसे बसली होती. समोरून सायकल हातात घेऊन रामा चालत येत होता. त्याची चाल बघून तो दमल्यासारखा वाटत होता. तसा पारावरचा माणूस म्हणाला, "काय रं रामा असा का येतुयास- सायकलचं पाय दुखाय लागलं काय? का तुझ्या पायातला जोर उतू चाललाय?" रामा पण कमी नव्हता. तो म्हणाला, "तुमीपन तुमचं डोळं घरी इसारलाय वाटतं? सायकल पंक्चर हाय ते दिसत नाय वाटतं?" तो टोला ऐकून चौघे गप्प बसली.

घरी आल्यावर सायकल भिंतीला टेकवून रामा हाशहुश करत बसला होता. तेवढ्यात त्याची नजर समोर गेली. घराचे चित्र विद्रुप दिसत होते. टाकीचा नळ चालू होता. त्याचा ओघळ आत्ताच सारवलेल्या अंगणाकडे जात होता. सारा चिखल झाला होता. ते बघून रामा चिडला. पलिकडे भांडी घासणाऱ्या बायकोला म्हणाला, "मागं बघ जरा. समदा राडा झालाय. ती भांडी सोड अन् मला च्या दे." असे शब्द ऐकून बायकोपण खणकली. म्हटली, " घ्या तुमचं तुमी करून. नायतर हाटीलात जाऊन प्या." तसा तिरमिरीत तो हॉटेलात गेला. तेथे जाऊन दोन मिनिटे डोळे मिटून बसला आणि चहाची ऑर्डर दिली. मालकाचे उत्तर आले," दूध संपलंय. च्या नाय." सकाळपासून अशा घडणाऱ्या घटनांनी रामाचे डोके भांबाऊन गेले. परत घरी जाऊन तो चहा प्यायला आणि दिलेल्या महत्त्वाच्या कामाबद्दल विचार करीत बसला.

दुपारी भरलेल्या मीटिंगमध्ये जो विषय झाला होता तो रामाला आठवला. शाळेच्या कामासाठी वर्गणी गोळा करायची होती आणि ती जबाबदारी रामाकडे आली होती. १०० रु. चे व ५० रु. चे पावती पुस्तकही त्याच्याकडे होते. त्यासाठी कुठे फिरायचे याचा विचार तो करीत होता. मित्र, नातेवाईक व गाव सोडून दुसरीकडे स्थायिक झालेल्यांची नावे

त्याच्या डोळ्यासमोर पटापट आली. त्याला रात्री झोप आली नाही. त्याला रात्री स्वप्नात तो वर्गणी मागायला गेलाय आणि लोकं थापा मारून हाकलताहेत असे स्वप्न पडले.

दुसऱ्या दिवशी सकाळी त्याने तालुक्याच्या गावची वाट धरली. शहरातील लोकांकडे गेल्यावर त्याला थोडी वर्गणी मिळाली तर काहींनी वर्गणी द्यायला जमणार नाही असे सांगितले. तर काहींनी उधारीवर पावत्याही फाडल्या. दिवसभर चालून पायाचे जणू तुकडे पडले होते. "साळा काय माझ्या एकट्याची हाय काय? ज्या साळंत त्यांचीच मुलं शिकत्यात त्याच साळंसाटी वर्गणी दिली तर बिघडलं कुठं?" असे विचारही त्याच्या मनात आले. असेच दोन तीन दिवस तो वेगवेगळ्या गावांत फिरला. थोडे पैसे त्याला मिळाले. त्याच्या मनाला थोडी उभारी आली.

बाकीच्यांनी काय केले हे पाहण्यासाठी तो शाळेत गेला. तेथे त्याला दिसून आले की कुणीही वर्गणी गोळा करण्यात रस घेतला नव्हता. हे पाहून त्याला वाईट वाटले. त्याने प्रत्येकाच्या घरी जाऊन त्यांची समजूत घातली. काहींनी त्याची चेष्टा केली. काहींना कौतुक वाटले. काहींनी तू लष्कारच्या भाकऱ्या का भाजतोस असा प्रश्नही केला. बाकीच्यांनी काही केले नाही हे पाहून तो दुप्पट जोमाने शहरात गेला. बऱ्याच मोठ्या लोकांना गाठून त्याने वर्गणी गोळा केली.

आता पुस्तके आणि रक्कम जमा करायला तो शाळेत गेला तेव्हा मुख्याध्यापकांना या खेड्यातल्या अडाणी माणसाचे कौतुक वाटले. बाकीच्या काम न करणाऱ्या लोकांत या अडाणी माणसाची कामगिरी उठून दिसत होती.

चार दिवसांनी शाळेच्या भूमीपूजनाच्या समारंभात रामाचा सर्व गावासमोर सत्कार करण्यात आला. त्याच्या अंगावर मूठभर मास चढले. त्याच्या बायकोला त्याचा अभिमान वाटला.

काही काळाने रामा सायकल घेऊन पंक्चर काढायला निघाला तेव्हा त्याची कोणीदेखील आधीसारखी थट्टा केली नाही. उलट रामरामच केला. हा बदल त्याला दिसून आला कारण त्याने केलेले सत्कृत्य— 'शाळेची वर्गणी.'

■

## सजी दुल्हन

धरती के माथे पर सजी है बिंदी
सूरज है उसका सोना
तारे है उसकी चाँदी

हाथो में सजे है हरे कंगन
पेडो से भरा रहता उसका आँगन

कानों में उसके सजी है बाली
झूम उठा पेड झूमती है डाली

पहना है उसने फुलों का हार
धरती पर आई है बहार

पैरो में उसके खनके ये पायल
झूमकर गाती है कोयल

पहनके आई हरी साडी
आते आते खुशियाँ लाई.

**हर्षवर्धन महामुलकर**
**श्रद्धा किरकिरे**
इयत्ता ८ वी

**(एक अविस्मरणीय सामना पान ३ वरून)** सर्वजण श्वास रोखून बसलेले. तो बॉलर पुन्हा पायाने माती उडवीत पळत आला पण यावेळेस मी त्याला धीराने सामोरे जायचे ठरवले. बॉल सुटला व बाऊन्स होऊन सरळ माझे थोबाड फोडण्यासाठी आल्यासारखा तोंडावर आला. मी माझे तोंड वाचविण्यसाठी बॅट लेगसाईडला फिरवत आडवी मारली व तो सिक्स गेला. माझा विश्वासच बसला नाही पण माझ्या तोंड वाचविण्याच्या प्रयत्नामुळे आम्ही मॅच जिंकली होती. सर्वांच्याच आनंदाला उधाण आले.

सर्वजण आनंदाने उड्या मारत होते मला काहीच कळत नव्हते. काही जण तर शर्ट काढून हवेत उडवत नाचत होते. सर्वांनी मला खांद्यावर घेतले. त्या गोंधळात मी जोरात खांद्यावरून दगडावर पडलो आणि बेशुध्द झालो. जेव्हा डोळे उघडले तेव्हा मी गळ्यात हात घेऊन दवाखान्याच्या कॉटवर आडवा पडलेलो होतो. ■

# क्षण एक

नम्रता मगर

इयत्ता ७ वी

कोकणातील एका खेड्यातील मध्यम आर्थिक परिस्थिती असणाऱ्या परिवारात अनसाचा जन्म झाला. समुद्राकाठी बागमंडले गावातील कोळीवाड्यात तिचे घर आहे. गाव फार लहान.

अनसा ही जातीने कोळी. पूर्वापार चालत आलेला हा व्यवसाय. पुरुषांनी मासे पकडायचे तर स्त्रियांनी ते विकायचे. नुसते मासे विकण्यापेक्षा मोठे कोणीतरी व्हावे असे अनसाला वाटे. सुरुवातीला आई-वडिलांना ती धंद्यात मदत करू लागली.

अनसाचा भाऊ बाबू शाळेत जाऊ लागला होता. त्याला खरेतर शाळेची बिलकुल आवड नव्हती. दिवसभर उनाडक्या करण्यातच त्याचा बराचसा वेळ जायचा. भावाप्रमाणे शाळेत जायची इच्छा अनसाच्या मनात वारंवार प्रबळ होत असे. तिच्याबरोबरच्या काही मुली तिला शाळेत जाताना दिसायच्या ते बघून तिचे भान हरपायचे. यांच्याप्रमाणे आपणही शाळेत जावे असे तिला वाटायचे. आपल्यालाही आई-बाबा शाळेत घालतील अशी वेडी आशा तिच्या मनात होती. पण दुसऱ्याच क्षणी ती स्वतःला सावरायची. मुलगा शिकतो म्हणून भावाचा होणारा लाड व मुलीकडे दुर्लक्ष? तिला वाईट वाटे. मलाही शाळेत घाला म्हणून ती रोज आई-बाबांच्या मागे लागे. परंतु आई-बाबा तिच्याकडे लक्षच देत नसत. हळू हळू ती तिच्या भावाच्या, बन्याच्या मागे जाऊन शाळेत बसू लागली. लक्षपूर्वक ऐकू व शिकू लागली. जाऊ देत लहान आहे. म्हणून बाबांनी तिचे नाव शाळेत घातले. त्यावेळी तिला खूप आनंद झाला. आई-बाबांना वाटले, नंतर ती कंटाळेल पण ती शिकतच राहिली.

अनसा हुशार होती. सर्व मुलांआधी हिचे उत्तर तयार असे. ती चार-पाच इयत्ता शिकली. शाळेत तिचा पहिला नंबर आला. पण घरात याची दखल कोणी घेतली नाही. मात्र बन्या नुसता पास झाला तरी काय

कौतुक! अनसाला वाईट वाटले. तिने याबद्दल विचारले तर आईने खूप मारले व म्हटले, "आनशे माझ्या पोरावर तुझी नजर का? जळतीस व्हय ग? पुन्ना असं म्हन्शील तर बघ." अनसा म्हणाली, " आय मी काय लोकाची हाय व्हय?". आई म्हणाली, " व्हय व्हय माझी नाय तू बया. तू उद्या जाशील कुठंतरी. काय करायचं शिकून? शिकली तर लोकं तोंडात शेण घातल्याशिवाय राहत्याल व्हय? बास कर ते शिक्ष्यान."अनसा गप्प बसली.



अनसा सहा इयत्ता शिकली, तसं आई-बाची शिक्षण बंद कर अशी भुणभुण लागून राहिली. पण ती लक्ष देत नसे. आई म्हणायची,"तुझी साळा बास कर म्हंजी घरात लक्ष राहील. गुरं-ढोरं राकायला नको. मासं इकायला नको. नुसती हुंदाडतीस. माझा बन्या बग". बन्या काय काम करतो असा अनसाला प्रश्न पडायचा. कारण दिवसभर तो घरी नसायचा.

आनसाला वाटले, सहजच म्हणत असतील आई-बाबा. पण नाही. तिला शाळेतून घरी ठेवण्यासाठी आई-बाबानी पुस्तके देणेच बंद केले. बन्या तर तिला पुस्तकाला हात लावू द्यायचा नाही. तो एकवेळ पुस्तके फाडील पण तिला द्यायचा नाही. पण अनसा काही लेचीपेची नव्हती.

तिच्या शाळेतील वेणू गुरे राखायची. तिच्याकडे पुस्तके होती. अनसा आईकडे गेली आणि गुरे



राखायला जायचे कबूल केले. ती पण रोज माळाने गुरे राखत जायची आणि वेणूबरोबर तिच्या पुस्तकावरून अभ्यास करायची.जणू ती एका दगडात दोन पक्षी मारत होती.

असा अभ्यास तिने नवव्या इयत्तेपर्यंत केला. मात्र दहाव्या इयत्तेतवेणूचे लग्न झाले. आता पुन्हा प्रश्न! तिने मास्तरांना **(पान २८ वर)**


## असे का?



मुले देवाघरची फुले
हे वचन झाले जुने
मुलगा झाला राजा
मुलीच्या हाती धुणे
मुलाचे पुरविले हट्ट
मुलगी राहिली मठ्ठ
मुलीला रोज रोज काम
मुलगा करतो आराम
मुलाला तूप-रोटी मिळे
मुलीला नेहमीच शिळे
मुलगा असे वंशाचा दिवा
मुलीला वाटे त्याचा हेवा
आई सांभाळते मुलाचे मन
मुलगी मात्र परके धन
मुलाला मिळतो साखरेचा पाक
मुलीवर मात्र सगळ्यांचा धाक
मुलगा मोठा धष्टपुष्ट
मुलीला नेहमीच कष्ट
जो देई मुलीला दंडा
त्याच्या झोळीत पापाचा धोंडा.

**निशिगंध धुमाळ**
इयत्ता ८ वी





## माय माय

माय माय
माझ्या जन्माची आय
आई आई, किती कामाची घाई
आई ग आई, दे ना दुधाची साई
तुझी सदैव कामाची घाई.
मग कशाला करतेस डब्याची घाई
किती करतेस कामाची घाई.
आई तुला कंटाळा नाही?

**पवन गावडे**
इयत्ता ६ वी

## आई

आई आई किती कष्ट घेतेस तू
सकाळी लवकर मला उठवतेस तू
तोंड धुताच चहा देतेस तू
आंघोळीचे पाणीही काढतेस तू
हे सारे प्रेमाने करतेस तू
दुपारचा स्वयंपाक, रात्रीचा स्वयंपाक
न कंटाळता करतेस तू
एवढच करून थांबत नाहीस तू
बाबांना हातभार लावतेस तू
शाळेची नोकरी करतेस तू
अशी माझी आई किती दमतेस तू
तुझ्यासाठी देवाला प्रार्थना करतो मी



**सुशांत काकडे**

इयत्ता ८ वी


## आई

शाळेतून घरी गेल्यावर दिसते प्रथम आईच घरात
वाट बघत असते माझी सदैव दारात.
खेळून आल्यावर वाजतात जेव्हा सात
तेव्हा केळं घेऊन बसलेली असते हातात.
लिखाण कधी असेल तर देते मला लिहून
तेव्हा मात्र जातो मी आनंदित होऊन.
कधी कधी मात्र ती मारते मला
तेव्हा तिचा राग येतो मला.
तरीही खूप चांगली आहे माझी आई
घरात सगळे म्हणतात तिला माई.



**अक्षय लिपारे**
इयत्ता ६ वी

## तिला आपण माता म्हणावे



जिची हाक ऐकताना मन आनंदाने उसळ्या मारते
तिला आपण माता म्हणावे
जिच्या मायेच्या स्पर्शानि आपले दुःख नाहीसे होते
तिला आपण माता म्हणावे.
जिच्या कुशीत स्वर्गसुख साठलेले असते
तिला आपण माता म्हणावे.
जी चुकीचे पाऊल वेळीच थांबवते
तिला आपण माता म्हणावे.
वृक्ष नाही छाया नाही
माता नाही माया नाही.

**आदित्य अरविंद कुलकर्णी**
इयत्ता ८ वी

# एकदा

## संचिता निंबाळकर

इयत्ता ७ वी

परीक्षा, परीक्षा, परीक्षा... संपल्या एकदाच्या परीक्षा. आता दोन महिने अभ्यासाला चार हात लांबच ठेवलेले बरे. सुटलो. आम्ही आता आमच्या मर्जीचे मालक. उन्हाळ्याची सुट्टी मौज मजा, धांगड-धिंगा यातच घालवायची असते. हो ना? मग फलटणमध्ये तर नकोच. या गर्दीतून बाहेरच्या मोकळ्या दुनियेत, निसर्गासमवेत. पण कुठे? चला विंचुर्णीला जाऊया. असा विचार माझ्या मनात आला.

विंचुर्णी माझे छोटेसे, दगड-धोंड्याचे पण छानसे गाव. मला विंचुर्णी म्हटले की वेगळाच आनंद होतो. फलटणपासून ७-८ कि.मी. वर असलेले विंचुर्णी हे गाव अगदी निसर्गरम्य आहे. किती ते निरनिराळे पक्षी वेडावून टाकतात. वनस्पती, झाडे, रंगीबेरंगी फुलांवर बसलेली फुलपाखरे, बाजूने दोन तलाव व मध्ये असलेलं गाव. असे वाटते तिथून परत फलटणला येऊच नये. अशाच एका उन्हाळ्याच्या सुट्टीत मी विंचुर्णीला गेले होते. सुट्टीत सगळे पाहुणेच पाहुणे आले होते. आम्ही सर्वांनी ठरविले रोज घरी खेळण्यापेक्षा एकदा रानात जाऊ. पण व्हायचे तेच झाले. घरी विचारले तर जायचे नाही असे उत्तर मिळाले.

एकदा दुपारी सगळेजण झोपले असताना आम्ही चोर पावलांनी घराबाहेर पडलो. आमचे रान घरापासून खूपच लांब होते. झाडे धुंडाळ, दुसऱ्यांच्या शेतातून जा असे खोडकर उद्योग करत आम्ही शेतात केव्हा आलो ते कळलेच नाही.तो सगळा हिरवा परिसर, कुठे तरी दिसणारे निळसर पाणी, आकाशातून उडणारे पक्षी, वाऱ्याने हलणारी झाडे. किती सुंदर होते ते दृष्य!

आम्ही शेतातून चालू लागलो. अशा सुंदर परिसरात आम्ही असे हरवून गेलो की जमिनीचा जणू विसरच पडला. माझ्या पायावरून सरडा गेला तरी मला कळले नाही. कदाचित माझ्या पायाचा चिखलाने भरलेला रंग पाहून त्याला जमीनच

वाटली असावी. हे सर्वांना सांगण्याआधीच तो सरडा कुठे शेतात गेला ते कळलेच नाही. आम्ही परिसराच्या निरीक्षणात इतके भारावून गेलो होतो की मला काही झाले का? लागले का?याकडे सर्वांनी दुर्लक्ष केले आणि त्यात मी देखील सगळे विसरून निसर्गाच्या सान्निध्यात रमले. मधूनच माझ्या ताईने किती वाजले? असे विचारले पण आम्ही दुर्लक्ष केले. आम्ही खूप मजा करत होतो. कुणाला वेळेचे भानच नव्हते.

आम्हाला पोहायला जावेसे वाटले. पण कोणालाही नीट पोहायला येत नव्हते. पण खूप पोहावेसे वाटले म्हणून पुढचा मागचा विचार न करता आम्ही तिथल्या तलावात उतरलो.

संध्याकाळ झाली. वारा सुटला होता. हळू हळू पक्षी घरट्याकडे जाऊ लागले. पण आमचा डुंबण्याचा मोह आवरला नाही. अचानक एक किंकाळी ऐकू आली. पाहिले तर माझी बहीण मला काठावरती कुठेच दिसेना. कुणाला काय करावे काहीच सुचेना. अंधार होत होता. घरच्यांची भीती तर वाटतच होती पण सर्वात भीती वाटत होती ती म्हणजे ताई पाण्यात बुडाल्याची. अशा दुहेरी संकटात आम्ही मुले सापडलो होतो. आम्हा सर्वांमध्ये मी मोठी होते म्हणून पाण्यात जाण्यासाठी मी मन घट्ट करत होते. मलाही नीट पोहता येत नव्हते. तरीही त्या पाण्यात मी ताईला शोधण्यासाठी पुढे पुढे जाऊ लागले. सगळीकडे शोधून शोधून थकले. पण ताई मात्र कुठेच सापडली नाही. काही झाले तरी घरी जायचेच होते. आता आम्ही घरच्या वाटेकडे लागलो होतो. आमच्या घोडचुकीमुळे आम्ही ताईला हरवले होते. आता या सर्व प्रसंगामुळे आम्हाला एक कळले होते की वडीलधाऱ्यांच्या परवानगीशिवाय बाहेर जायचे नाही.

रानात येताना फुलून आलेली फुले आता कोमेजून चालली होती. निराशेत रस्ता तुडवत असताना अचानक आमची कळी उमलली. माझी ताई रस्त्यात दिसली. पण मग पाण्यातील किंचाळी कोणाची होती? ती होती दुसऱ्याच कुणाची तरी. ताई तर आम्हाला सांगूनच घरी आली होती. पण आम्ही पोहण्यात इतके रंगून गेलो होतो की ते आम्ही साफ विसरलो होतो. आता आम्ही सर्व मुले आनंदाने फुलून आलो. पण तुम्ही मात्र असे न सांगता कुठे जाऊ नका हं!

■

(क्षण एक पान २२ वरून)

सांगितले मास्तरांना खूप वाईट वाटले. एवढी हुशार मुलगी वाया जाऊ नये म्हणून मास्तरांनी तिला मदत केली. तोपर्यंत घरात अनसाच्या लग्नाचे सुरू झाले. मास्तरांनी घरात चार शब्द सांगितले. तेव्हा कुठे गाडी रुळावर आली.

अनसा आता झटून अभ्यासाला लागली. बन्यालाही ती समजावून सांगायची पण त्याची गाडी काही रुळावर आली नाही. परीक्षा आता जवळ आली. अनसाने सर्व पेपर चांगले सोडविले. जून महिन्यात तिच्या जीवनात सुवर्णाक्षरांनी लिहिलेला दिवस उगवला. सर्व गावात तिची चर्चा सुरू झाली. पेपरामध्ये तिचा फोटो छापून आला. तिचा बोर्डात नंबर आला होता. तिचा गावात सत्कारही झाला. कौतुकात जणू ती न्हाऊन निघाली होती.

इकडे तिचे आई-बाबा मात्र बन्या नापास झाला म्हणून अनसावरच नाराज होते. तिच्या लग्नाचे घेऊन बसले होते. सर्व गावाने त्यांना शिव्या दिल्या. सरपंचांनी देखील समजावले. आणि अनसा तालुक्याला शिकायला गेली. ती आता होस्टेलवर रहात असे. कधी आई-बाबा पैसे पाठवीत तर कधी नाही. अनासा धाडसी होती. तिने 'कमवा आणि शिका' या योजनेत भाग घेतला आणि आपल्या गरजा पूर्ण केल्या. तिने चांगल्या पध्दतीने आपले कॉलेज पूर्ण केले. पण तिला एवढ्यात बास करायचे नव्हते. तिने पेपरात एम.पी.एस्.सी. ची जाहिरात वाचली आणि परीक्षा द्यायचे ठरवले. त्यासाठी रोज वर्तमानपत्रे वाचू लागली. खूप अभ्यास करू लागली. परीक्षा देऊन ती आता गावाकडे आली. गाव पूर्ण बदलला होता. गावाने तिचे स्वागत केले.

अशाच एका दिवशी अनसाच्या दारात पोलिसांची गाडी आणि पोस्टमन एकाच वेळी आले. काय झाले कुणालाच काही कळेना. पोलिसांनी बन्याच्या हातात बेड्या घातल्या आणि पोस्टमनने अनसाच्या हातात एक पत्र दिले. बन्याला खुनाच्या आरोपात अटक झाली होती तर अनसा एम.पी.एस.सी.च्या परीक्षेत प्रथम आली होती. एक बातमी आनंदाची तर दुसरी दुःखाची. क्षण एकच होता पण दोघांच्या जीवनाला वेग वेगळा अर्थ प्राप्त झाला होता. ■

# केरळ प्रवास

देविका बर्गे

इयत्ता ७ वी

दिवाळीची सुट्टी सुरू झाली. आम्ही केरळला जायची तयारी सुरू केली. बघता बघता १४ तारीख आली. आम्ही २.३० वाजता साताऱ्यात पोहचलो व ३.१५ पर्यंत मामाकडे थांबून ३.१५ वाजता आम्ही केरळचा प्रवास सुरू केला. पहिला मुक्काम आम्हाला मालवणला करायचा होता. पण आम्ही मुले सारखीच भूक लागली म्हणून गाडी थांबवायचो. त्यामुळे आम्हाला मालवणला पोहोचायला उशीर झाला असता. म्हणून कणकवलीमध्येच मुक्काम केला. डॅडी व काका म्हणत होते आपण १.३० पर्यंत मालवणला पोहोचू. पण आम्हा मुलांना खूपच झोप आली असल्यामुळे आम्ही पुढचा प्रवास नाहीच म्हणालो. मालवणला जायचे म्हटल्यावर थोडे फिरायला नको का? तिथला निसर्ग बघायला नको का? रात्री काय दिसणार आहे? कणकवली मालवणपासून १९ कि.मी. होती. आम्ही मधल्या सीटवरचे सगळे सामान मागे टाकले पल्लवीताई आणि रोहिणीताईला पुढच्या सीटवर पाठवले आणि आम्ही निवांत झोपलो.

दुसऱ्या दिवशी म्हणजेच १६ तारखेला आम्ही सिंधुदुर्ग किल्ल्यावर जायचे ठरवले. रस्त्याच्या दुतर्फा झाडी, सगळीकडे हिरवेगार असे कोकण. मी कोकण कधीच पाहिले नव्हते त्यामुळे ते पाहिल्यावर माझा विश्वासच बसेना की हे कोकण आहे म्हणून. माझी कल्पना अशी होती की एक मोठा डोंगर, कडेने दऱ्या, नारळाची झाडे असे कोकण असेल. किल्ल्यावर जाण्यासाठी आम्ही समुद्र किनाऱ्याजवळ गेलो. तिथे तिकिट काढण्यासाठी रांगेत अर्धा तास उभे राहिलो. मग तिकिट काढून सिंधुदुर्ग किल्ल्यावर गेलो. तिथे नुसतेच फिरलो नाही तर मी त्याच्या तटबंदीबद्दल माहितीही मिळविली.

किल्याचा तट वळणावळणाचा असल्यामुळे लाटांच्या तडाख्याचा त्याच्यावर परिणाम होत नाही. लाटांच्या माऱ्याप्रमाणे तटाची उंची

काही ठिकाणी ४० फुटांपर्यंत आहे, तर काही ठिकाणी २० ते २२ फूट आहे. तटाची रुंदी सरासरी १० फूट आहे. नागमोडी वळणाच्या तटाला बळकटी आणण्यासाठी भक्कम असे ५२ बुरूज बांधण्यात आले. त्यावर तोफा, बंदुकी यांचे मारे करण्यासाठी झरोके आहेत. यामुळे कोणत्याही ठिकाणी तटाजवळ आलेल्या शत्रूवर परिणामकारक देखरेख ठेवता येत होती.

सगळे बघून झाल्यावर आम्ही समुद्र-किनारी मासे खाल्ले व पुढच्या प्रवासाला सुरुवात केली.

दिनांक १७ ला आम्ही गोकर्ण महाबळेश्वरला गेलो. तेथे पिंडीचे दर्शन घेतले. इथे रावणाला शिवाने दिलेल्या शिवलिंगाचे स्वयंभू स्थान तिथे आहे. इथली शंकराची पिंड खोलगट आहे. या गावाच्या शेजारूनच इरावती नदी जाते. या नदीचे पाणी म्हणजे रावणाने केलेली शू अशी दंतकथा आहे. उशीर झाल्यामुळे आम्ही गोकर्ण मध्येच मुक्काम केला. सकाळी आवरून आम्ही जोग फॉल्स बघायला गेलो. आम्ही मुले खूष होतो कारण आता धबधब्यात नाचायला मिळणार होते. पण ते धबधबे लांबूनच बघायचे होते. त्यांची उंची ९६० मीटर व खोली ६० मी. आहे. इथेच शरावती नदी आहे. सीतेला तहान लागली म्हणून रामाने बाण मारला व तेथून नदीचा उगम झाला. शरावती. =शर + आवती शर = बाण आणि आवती = मारणे होय. तेथे एकूण चार धबधबे एकत्र वाहत आहेत. हे धबधबे बघितल्यावर आम्ही पुढे निघालो. जाताना जोग धबधबा ते भटकल असा पूर्ण ८० कि.मी.चा घाट व घाटात पूर्ण जंगल. या जंगलात जंगली श्वापदे आहेत. त्या दिवशी आम्ही मंगलूर मध्ये मुक्काम गेला.

दुसऱ्या दिवशी गुरूवायूरला गेलो. गुरूवायूरमध्ये पहाटे पाचला मंदिरात गेलो. या विष्णूच्या मंदिरात ६८ हत्ती आहेत. मंदिरातील मूर्ती, दागिने, हत्तीच्या मस्तकावरची झूल इत्यादी सर्व सोन्याचे आहेत.

केरळमधील निसर्ग पाहून आम्हाला तिथून परतावेसेच वाटेना. आम्ही तिथे दोन दिवस मुक्काम केला व नंतर कन्याकुमारीसाठी रवाना झालो. तिथे आम्ही एक अतिप्राचीन मंदिर बघितले. या मंदिराचा उल्लेख महाभारतात आढळतो. अर्जुन आणि बलराम देवीच्या दर्शनाकरिता येथपर्यंत पायी आले होते. कन्याकुमारी बघून आम्ही पुढे रामेश्वरला गेलो. इथल्या मंदिरात

इथल्या मंदिरात २३ वेळा अंगावर पाणी घ्यायचे असते. तसे न केल्यास दर्शन अपुरे राहते. नंतर आम्ही समुद्राच्या पाण्यात खूप मजा केली. शेवटी नको वाटत असताना आम्हाला परत माघारी लॉजवर जायला लागले. पण ते समुद्राचे दृश्य काही केल्या माझ्या डोळ्यासमोरून हालेनाच. शेवटी एकदाचे लॉजवर आलो.

मदुराई हे आमचे शेवटचे ठिकाण होते. इथे बघायला काही नाही, पण साड्या चांगल्या मिळतात. खरेदी अटोपून आम्ही शेवटी मीनाक्षी मंदिर बघितले व तेथेच मुक्काम केला.

दुसऱ्या दिवशी बेंगलोरहून येताना वसीमदादाची आठवण झाली. पण त्याचा पत्ता व फोन नंबर नसल्याने त्याला भेटता आले नाही. असा मजेचा प्रवास करीत आम्ही केव्हा साताऱ्याला पोहोचलो ते कळलेच नाही. सकाळी उठलो ते फलटणलाच. असा हा केरळ प्रवास अगदी अविस्मरणीय होता. ■



# बंद पडलेला टीव्ही

श्रध्दा कुलकर्णी

इयत्ता ८ वी

(घरात नवीन टीव्ही आणला आहे. त्याचा रिमोट घेऊन श्रध्दा तासन् तास टीव्हीपुढे बसत असे. एक दिवशी...)

**आशुः** अगं आई, ताईला सांग ना आवाज बंद करते आहे.

**आई :** अरे देवा परत सुरू झालं दोघात युध्द. मी तर वैतागले या सर्वांस. ए श्रध्दा आवाज कर बाई. सदान् कदा बघावं तेव्हा रिमोट तिच्याच हातात.

**बाबाः** श्रध्दा रिमोट इकडे आण.

**श्रध्दाः** अहो बाबा तो विनाकारण रडतोय. आजोबांना ऐकू येत नाही. म्हणून मला आवाज मोठा करावा लागतो तोवर कानठळ्या बसतात. बातम्या संपल्यावर आवाज बंद केला तर कुठं बिघडतं आहे?

**आजीः** सगळ्यांनी गप्प बसा.

**आजोबाः** ए श्रध्दा, बातम्या लागल्या आहेत.

**श्रध्दाः** हो हो मोठा करते की आवाज

( टीव्ही चे एकदम चित्र जाते.)

**आजोबाः** श्रध्दा अगं चित्र आणि आवाज कसा गेला?

**बाबाः** अजीबात रिमोटला हात लावायचा नाही.

**आशूः** अरे देवा, श्रध्दा काय केलंस. नक्कीच ट्यूब गेली असणार.

**आईः** अगं तू तर आम्हाला खड्ड्यातच घालशील.

**श्रध्दाः** ए दीड शहाण्या गप्प बैस. मला सांगतोय काय गेलं आणि काय नाही.

**आशूः** खोटं का बोलतेस? सांग काय झालं ते.

**श्रध्दाः** गप रे तू. (खूप गोंधळ झाल्यानंतर)

**आजीः** या टीव्ही ची वायर तर नाही ना निसटली?

**आशूः** नाही गं आई ताईनेच काही तरी गडबड केली आहे.

**आजीः** बघा तरी, वायर निसटली का? (टीव्ही ची वायर निसटलेली असते)

**श्रध्दाः** बघ आशू उगाच टीव्हीची ट्यूब गेली न् अजून काय काय बरळत होतास तू.

## मी सांगू? हो सांगा

आज काय मजा केली सांगू?
हो सांगा
आम्ही पहायला गेलो नदी बाणगंगा
कसे गेलो ते सांगू?
हो सांगा
केल्या होत्या आम्ही दोन रांगा
आधी पोलिस स्टेशन मग विमानतळ
चालून चालून आली पायात कळ
पाहिली नदी बाणगंगा हो बाणगंगा
तिथं काय केलं ते सांगू?
हो सांगा
आधी डबा खाल्ला मग चित्रे काढली
मग केला खूप खूप दंगा हो दंगा!
आम्ही पाहिली हो नदी बाणगंगा.

**प्रांजली भुजबळ**
इयत्ता २ री



## काया काया अंधारात

काया काया अंधारात
कसा करू रे अभ्यास
अभ्यास तर आहे खूप
गणित अन् विज्ञान
कसा लागेना हा दिवा
काय करू रे देवा
दिव्याच्या या धुराने
डोये माझे चुरचुरे
डोये चोयून चोयून
लाल लाल झाले.

**ओमप्रकाश धुमाळ**
इयत्ता ५ वी

# भैंस

शाहीन शेख

इयत्ता ९ वी

यह बात है आठवी कक्षा की। हमें दीवाली के बाद लडकी-लडकों के गट कर कर वर्क एक्स्पेरिअन्स के लिए भेजा गया था। मेरा गट धुलदेव गया था। यह वर्क एक्स्पेरिअन्स चार दिन का था। उसी चार दिन में घटी ये मजा सुनो।



हम दिन भर का काम करकर, हँसी मजाक करते करते घर वापस लौटने के लिए बस स्थानक पर आ रहे थे। शाम के लगभग छ बजे होंगे। दोनो तरफ खेत थे। हम बीच के रास्ते से चल रहे थे। सब किसान अपनी-अपनी गाएँ, भैंसे लेकर घर आ रहे थे। उन भैंसो में से एक भैंस अचानक दौडने लगी। हम भैंस के आगे थे सो हम भी दौडने लगे। जैसे हम दौडने लगे वैसे भैंस भी और जोर से दौडने लगी। शायद हमारे कपडों का रंग लाल रहने से ही वो हमारे पीछे दौड रही थी। किसी को कुछ सूझ नहीं



रहा था। हम में से कोई खेत में घुस गए तो कोई घर में। मैं और पायल डर के मारे एक बाथरूम में घुस गए।

आखिर, विशालने भैंस पकडी और किसान के हवाले की। सचमुच हमारे जान में जान आ गयी। अगर विशाल न होता तो न जाने क्या होता। अब दूसरी बात सुनो। हमारा धुलदेव

में तीसरा दिन था। हम दोपहर के समय खाना खाकर खेत में घूमने के लिए निकले। सभी तरफ शांती ही शांती थी। दोनो तरफ घास हिल डुल रही थी। हम एक के पीछे एक खेत के चौहारे पर से चल रहे थे। अचानक आशियाना के सलवार में गिरगिट घुस गया। वह जोर से चिल्लाई। उतने समय में वह गिरगिट उसकी घुटने तक पहुँचा। वह अंदर इधर से उधर घूम रहा था। आशियाना बहुत चिल्ला रही थी। सभी डर गए। हमारे साथ लडके भी नहीं थे। इतने में धीरे से गिरगिट नीचे आया। सलवार के नीचे उसकी पूँछ दिखाई दी। तभी दिपाने उसकी पूँछ पकडी और जोर से खींची। तो पूँछ टूटकर हाथ में आ गयी और गिरगिट फिर से उपर चला गया। अब आशियाना को पसीना फूट गया। हम सब लडकियाँ बाजू में खडी थी। उधर से आवाज आई, "साप है"। अब तो आशियाना रोने लगी। इतने में वह गिरगिट अपने आप ही बाहर निकल आया। अब आशियाना के जान में जान आई। वे दिन मुझे अच्छी तरह याद रहेंगे। ■

## रिमिक्सचे वेड

जुन्या गाण्याचे वाटोळे केले म्युझिक कंपनीने
रिमिक्स काढले आजच्या पिढीने
गाण्याचा अर्थ कुठल्या कुठे जोडला
ओल्ड इज गोल्ड या नावाने प्रसिध्द केला
म्युझिक कंपनीने पैसा खोऱ्याने ओढला
सगळ्यांच्याच जिभेवर नाचला काँटा लगा
रिमिक्सचे वेड हे साऱ्या जगाला लागले
जुन्या गाण्याचे सगळे वाटोळे केले

**पूजा तिटवे**
इयत्ता ९ वी

# नगर पालिकेच्या शाळेतील मुलांची मुलाखत

प्राजक्ता पाटणकर

इयत्ता ८ वी

प्रश्न तुमच्या शाळेचे नाव काय?

उत्तर नगरपालिका शाळा क्रमांक पाच

प्रश्न इथे कितवीपर्यंत शाळा आहे?

उत्तर पहिली ते सातवी पर्यंत.

प्रश्न शाळेत सर्वजण वेळेवर येतात का?

उत्तर नाही.

प्रश्न शाळेत वेळेवर का येत नाही?

उत्तर आमच्या शाळेतील कितीतरी मुले भाजी विकतात, सायकलच्या दुकानात कामे करतात. त्यामुळे आम्हाला रोज शाळेत यायला उशीर होतो. कधी कधी शाळा बुडते.

प्रश्न तुमच्या पालकांना या उशीर होण्याची कारणे सांगून शिक्षकांची भेट घ्यायला सांगता का?

उत्तर सांगतो. पण पालक तुला काय कळतय? साळा शिकून काय करायचय? आपला हा धंदाच बरा. अशी उत्तरे देतात.

प्रश्न तुम्हाला काही अडचणी आहेत काय?

उत्तर हो. रोज शाळेत येण्याजाण्याचाही खूप त्रास होतो. कारण शाळेच्या जवळच लॉ कॉलेज आहे. शाळेजवळ रस्ता असल्यामुळे वाहनांचा त्रास होतो. वाहनांच्या आवाजामुळे तासाला व्यत्यय येतो व लक्षही लागत नाही. शाळेत येताना जाताना रस्त्यातील बाजारामुळे व लॉ कॉलेजच्या विद्यार्थ्यांमुळे खूपच गर्दी होते. त्यामुळे अपघाताची भीती वाटते. तसेच लॉ कॉलेजची मुले बेभान गाडी चालवितात आणि गुरेही त्याच रस्त्यावरून जातात. ही शाळा २०० वर्षांपूर्वीची असल्यामुळे या इमारतीत पावसाळ्यात गळण्याचे प्रमाण खूपच आहे. बसण्याची मग अडचण होते.

# आमचे अनुभव

## अजिम मेटकरी, ओंकार शिरोळकर

इयत्ता ७वी

आमच्या कमला निंबकर बालभवन शाळेत दरवर्षी एखाद्या विषयावर प्रकल्प असतो. प्रकल्पानिमित्त मुले विविध प्रकारची मॉडेल्स् बनवतात. त्या विषयावर कविता, गोष्टी, लेख लिहितात. विषयानुसार विविध प्रकारची चित्रे काढतात. काही मुले या विषयाची अधिक माहिती घेण्यासाठी बाहेरच्या गावांना व स्थळांना भेट देतात. या वर्षी २००४ च्या प्रकल्पाचा विषय होता "बालहक्क".बालहक्कांविषयी मुलांनी विविध चित्रे काढली. विविध मॉडेल्स् बनवली, कविता केल्या, लेख लिहिले. शाळेत मुलांच्या भेटी घेतल्या, मुलाखती घेतल्या. अशा प्रकारे विविध पध्दतींनी मुलांनी बालहक्कांविषयी माहिती गोळा केली. आमच्या वर्गातल्या मुलांना प्रश्नावली दिली होती. त्या प्रश्नावलीतील प्रश्न शाळेतील प्रत्येक वर्गातील मुलांना विचारण्यास लावले होते. या प्रश्नावलीत मुलांना त्यांचे हक्क मिळतात का, त्यांच्या गरजा पूर्ण होतात का? त्यांच्या घरातील लोक एखादे कार्य करताना त्यांचे मत विचारतात का? हे समजण्यासाठी काही प्रश्न दिले होते. हे प्रश्न आम्ही मुलांना विचारले व आम्हाला मुलांनी योग्य ती उत्तरे दिली.

आमच्या शाळेतील जवळजवळ सर्वच मुलांच्या बऱ्यापैकी गरजा पूर्ण होत होत्या. परंतु बाहेरील म्हणजे जिल्हापरिषदेच्या, नगरपालिकेच्या, शासनाच्या शाळेतील सर्वच मुलांची आर्थिक परिस्थिती नाजुक असते. त्यांच्या गरजा पूर्ण होतात का? त्यांना त्यांचे हक्क मिळतात का? हे समजण्यासाठी आम्ही कापडगाव येथील जिल्हा परिषदेच्या शाळेस भेट दिली.

या शाळेतील मुले गरीब आहेत. त्यांच्या घरची परिस्थिती नाजुक आहे. त्या मुलांना घरी धड खाण्यासही मिळत नाही. त्यांना शाळेत दुपारचा हळदीचा भात मिळतो. त्यात ती मुले घरून आणलेले कालवण किंवा चटणी पाणी मिसळून खातात. पुस्तके व

गणवेश शासनाकडून मिळतात. क्रीडा साहित्यसुध्दा शासन पुरवते. परंतु तरीही त्या मुलांच्या गरजा भागत नाहीत. कोन मोजण्यास कोनमापक, कंपास असे साहित्य सुध्दा त्या मुलांजवळ नाही. यावरून त्यांच्या गरजा पूर्ण होत नाहीत हे दिसून येते. आम्ही त्यांना विविध प्रश्न विचारले. त्यांनी त्यांची खरी खरी उत्तरे दिली. त्या उत्तरांवरून त्यांच्यातील जवळ-जवळ अर्ध्या मुलांच्या सुध्दा किमान गरजा पूर्ण होत नसल्याचे दिसून आले.आम्ही सातवीच्या वर्गात गेलो. तेथे ३२ मुलांपैकी फक्त एकाजवळच पूर्ण कंपास होता. तसेच मुलांचा गणवेशही चांगल्या परिस्थितीत नव्हता. तेथे मुलांना खेळण्यास पूर्ण मोठे मैदान सुध्दा नव्हते. शाळेत पिण्याच्या पाण्याची व स्वच्छतागृहाची सोय नव्हती.

अशा प्रकारच्या परिस्थितीवरून मुलांच्या शालेय गरजा पूर्ण होत नसल्याचे दिसून आले. अशी परिस्थिती बघून आपण किती भाग्यवान आहोत याची जाणीव झाली. ■



(वारूगडावरची चोरी पान ५ वरून)
सशासारखी झाली. तात्याने विळा उचलला व तो मला मारणार तोच पोलिसांचा आवाज आला, "हँडस् अप्!" तात्याने हात वर गेले. मी तिथून पळ काढला. पोलिसांनी त्याला पकडले.इकडे गावात ही बातमी कळली. सगळीकडे आमचे कौतुक सुरू होते. आम्ही गावात आलो.गावकऱ्यांनी आम्हाला शाबासकी दिली. आम्हाला खूपच आनंद झाला होता. आता आमची गिरवी पुन्हा सुरू झाली. हे असे सुरू असतानाच आईने मला उठविले व म्हणाली, "अरे आज चित्रकलेच्या पेपरला जायचे नाही का?" मी आवरून शाळेत गेलो. या स्वप्नाची आठवण झाली आणि मी हसू लागलो. मला एकट्याला हसताना पाहून सगळे मित्र मला हसू लागले. असे होते ते माझे अविस्मरणीय स्वप्न. ■

## *गरिबीतला आनंद*

श्रीमंताच्या गाडीपेक्षा
गरिबाची सायकल बरी
श्रीमंताच्या बंगल्यापेक्षा
गरिबाची झोपडी बरी
श्रीमंताच्या गादीपेक्षा
गरिबाची वाकळ बरी
श्रीमंताच्या बागेपेक्षा
गरिबाची शेतं बरी

श्रीमंताच्या फ्रीजपेक्षा
गरिबाचा डेरा बरा
श्रीमंताच्या पोळीपेक्षा
गरिबाची चटण-भाकरी बरी
श्रीमंताच्या टीव्हीपेक्षा
गरिबाची माया बरी.

**मोहिनी घाडगे**
इयत्ता ६ वी

# सुरपारंब्या

## पराग श्रीखंडे

इयत्ता ९ वी

अशीच एक रणरणीत सुट्टीची दुपार. बाबांनी अभ्यासाला बसवले होते. पण अभ्यास करावासा वाटतच नव्हता (तसा कधी करावा वाटतो म्हणा...). तरीपण अभ्यासाला बसलो. तेवढ्यात आमची ठाकुरकीमधील दोस्त कंपनी इशाऱ्याच्या शिट्या देत आली.

आधीच खूप (?) अभ्यास झाल्याने वडिलांनी जरा रागावून का होईना परवानगी दिली. लगेच घराकडच्या चिंचेवर आमचा सुरपारंब्यांचा डाव रंगला. ते चिंचेचे झाड म्हणजे माझे चढाय-उतरायचे आवडते झाड. तेथे सुरपारंब्या खेळण्याची मजा काही औरच.

एकाने डाव घ्यायचा आणि बाकी सर्वांनी झाडावर चढायचे. डाव घेणाऱ्याने फेकलेली काठी आणायची व गोलात ठेवायची. मग आम्हाला पकडायला यायचे. तो एका फांदीवरून वरती चढला की दुसरीकडून एकाने झाडावरून खाली उतरून त्या काठीला शिवायचे. मग डाव घेणाऱ्याने परत डाव घ्यायचा. असा हा एकंदरीत खेळ असतो.

पप्पूवर नऊ वेळा राज्य आले होते. तो रडकुंडीला आला होता. मागच्या रविवारी गणप्यावर असाच मोजून सोळा वेळा डाव आला होता.

शेवटी पप्या पेटला व त्याने सरसर चढून बबल्याला पकडला. बबल्या डाव घ्यायला खाली उतरला. काठी फेकायला मी होतो. काठी खालून लांब फेकली. लगेच मागल्या पावली झाडावर चढलो. आमच्या या जोरदार कलकलाटामुळे आईची झोप मस्तच झाली होती. तिने मला दरडावून दुसऱ्या चिंचेवर जायला लावले. परत सगळी मुले लाल चिंचेवर गेलो. परत मी काठी फेकली व वर चढलो आणि उंच अशा फांदीवर गेलो. बबल्या मात्र खूपच चालू होता. तो जमिनीवरच थांबला. वर चढलाच नाही. तेवढ्यात आय.....आय....ओ... ही बाराखडी सगळ्यांना ऐकू आली. कारण मी ज्या फांदीवर बसलो होतो त्या फांदीवर

काहीतरी गुळगुळले. साप, नाग, अजगर अशा माझ्या मित्रांची मला आठवण झाली. मी पडता पडता वाचलो. एकदमच तोल गेला पण फांदी घट्ट धरल्याने नुसता लोंबकळत राहिलो. कसा बसा पुन्हा वर चढलो आणि पाहतो तर काय माझ्यासमोर सरडा होता. तसाच खाली उतरलो. एकदम मटकन खाली बसलो. घामाघूम झालो होतो. या प्रकारामुळे मी पूर्ण हबकलोच होतो. अजून सुध्दा आठवण झाली की छातीत धडकी भरते. कधी कधी आपण ज्यांना घाबरत नाही अशा गोष्टी जबरदस्त भीती घालतात. त्याआधी व नंतर मी खूप सरडे पकडायचो. पण त्या एका सरड्याला साप असेल अशा समजुतीने मी घाबरलो होतो. माझा ब्रेकडान्स सुरू असताना काहीच न कळल्याने बबलू माझ्याकडे आ वासून बघत होता. तेवढ्यात पिंट्याने काठीला शिवले व बबल्यावर परत डाव आला ही गोष्ट वेगळी. ■



# जेव्हा काळ धावून येतो

हर्षवर्धन महामुलकर

इयत्ता ८ वी

जिथे सागर किनारा तिथे कोळी लोक आलेच. अशाच एका किनाऱ्यावर कोळी लोकांचा संसार अगदी सुखाने चालला होता. हे लोक भल्या पहाटे आपल्या होड्या घेऊन लांब समुद्रावर जायचे अन् दुपारी-संध्याकाळी टोपल्या भरून मासे आणायचे. अशाच एका कुटुंबात गोप्याचा जन्म झाला. जन्मापासूनच त्याचे आणि समुद्राचे एक अतूट नाते होते. तो लहानपणी दिवसभर समुद्र किनाऱ्यावर खेळत असे. शिंपले गोळा करीत असे. लाटांबरोबर शिवाशिवीचा खेळ खेळत असे. वाळूत लोळत समुद्राकडे एकटक पहात असे. कोळीवाड्यातल्या लोकांचा गोप्यावर भारी जीव होता. ती लोकं कौतुकाने म्हणायची, "आवं गोप्याची आय, तुमचा गोप्या म्हंजी लाकात येक हाय बगा".

गोप्या हळू हळू मोठा झाला. समुद्राच्या लाटांबरोबर खेळणारा गोप्या त्याच लाटांवर आरूढ होणारा कोळी झाला. म्हाताऱ्या आई-बाचा आधार झाला होता.

एक दिवस असाच तो समुद्रात गेला. किनाऱ्यावर दिवस पश्चिमेकडे झुकत होता. दिवसभराच्या श्रमाने थकून भागून सूर्याची स्वारी क्षितिजाच्या पार चालली होती. गुलालाची उधळण झाल्याप्रमाणे संधिप्रकाश लाल रंगाची उधळण करत होता. तरीही गोप्याचा अजून पत्ता नव्हता. अजून गोप्या कसा आला नाही या चिंतेत त्याची माय रडकुंडीला आली होती.

"आजून कसा वं गोप्या आला नाय? मला तर लई भ्या वाटतंय बगा"

"आगं ईल गं"

"आवं रोज दोपारच्याला येतो की"

"चल आपण बघूया तर"

"व्हय व्हय चला"

गोप्याचा बा आणि माय दोघं गोप्याला हुडकायला गेले. पाहतो तर काय गोप्या समुद्राकडे बघत उभा राहिला होता.

"पोरा, काय रं बघतुयास?" त्याची



माय म्हणाली. "काय न्हाय गं, त्या मावाळत्या सूर्याकडं बघतुया."


"आरं आसा मावाळता सूर्य बगायचा नसतु, चल बगू घरी." म्हणत गोप्याच्या मायने त्याला घरी आणले.

गोप्या थकलेला होता."आय लय भूक लागलीय". "व्हय रं माझ्या बाबा, तुझ्यासाठी चांगलं माशाचं कालवण केलंया बग." जेवण करून गोप्या बाहेर अंगणात चंद्र-चांदण्याच्या शीतल प्रकाशात बसला होता. त्याच्या आठवणींना उजाळा मिळत होता. त्याला आठवत होत होती त्याच्या लहानपणची. तो जेव्हा लहान होता तेव्हा कसा तो समुद्राकडे पळत जायचा आणि बा कसा त्याला पकडायचा. बा आणि तो कसे लाटांना हरवून मासे पकडायचे. तो कसा सकाळच्या पारी शंख शिंपले गोळा करायचा.बघता बघता गोप्याचा डोळा लागला. पहाटे फटाटलं. गोप्या अजून स्वप्नाच्या दुनियेतच रमला होता. बा बरोबर लाटांच्यात खेळत होता. लहान मोठ्या लाटा येत होत्या. गोप्या मोठ्या मोठ्या लाटांवर आरूढ होत होता. तेवढ्यात ही मोठी लाट आली. वर पाहिलं तर ती आकाशालाच टेकली होती. रणांगणातल्या सैन्यासारखी ती किनाऱ्यावर चालून आली. कोळ्यांची घरे जमीनदोस्त झाली. त्या लाटा म्हणजे काळच वाटू लागल्या उगवत्या सूर्याचा लाल

प्रकाश रक्त बाटू लागला. लहापणापासून साथ देणारा किनारा भकास दिसू लागला. तो समुद्र, किनारा आणि गोप्या यांच्यातले नाते जणू त्या लाटेने क्षणात तोडून टाकले होते. गोप्या नुसता वेड्यासारखे ओरडत होता. "आय कुठयस?"पण दूर दूर पर्यंत त्याची हाक ऐकणारे कोणीच नव्हते. गोप्याला साखर-झोपेत सोडून किनाऱ्यावर गेलेले सारे कोळी लोक कायमचे समुद्रात गेले होते. उरल्या होत्या केवळ आठवणी.

■

## फुलपाखरू



लिंबाच्या झाडावरली
एक आळी पकडली
बाटलीत तिला घालून ठेवली
घालीत होते रोज तिला पानं
तिचं चाललं होतं भराभरा खाणं
असे झाले पंधरा दिन
मग तिने केली कोशाची वीण
कोशाकडे मी रोज पाही
कोश मात्र निवांत राही
एक दिवस चमत्कार झाला
बाटलीत फुलपाखराचा जन्म झाला
उघडता बाटलीचे झाकण
झाले ते निसर्गात तल्लीन.

**शलाका उंडे**
इयत्ता ६ वी

## अंतराळ

मला वाटतं अंतराळात जावं,
जगात मोठं नाव कमवावं,

चंद्रावर जाऊन गाणी गावीत,
चांदण्यांबरोबर फुगड्या घालाव्यात.

सूर्याच्या किरणांना हात लावावा,
लांबून सूर्याला नमस्कार करावा.

लोक म्हणतात मोठा आहे गुरू,
मला तर वाटतं जाऊनच पाहू.

प्लूटो मात्र फारच वेडा,
त्याचा आहे शेवटी धडा.

**दिपाली खेडकर**
इयत्ता ९ वी



## अंतरिक्ष यात्री

होणार मी अंतरिक्ष यात्री
देते मी याची खात्री.

माझे असेल यान लहान
पण म्हणतील मला महान.

स्वप्न माझे चांदण्यांशी हितगूज करण्याचे,
त्यांना स्पर्शून पाहण्याचे.

जिद्दीने करीन मी माझे स्वप्न साकार,
देणार नाही मला कोणी नकार.

**अंकिता फणसे**
इयत्त ७ वी

# My Ideal Person

Pranita Shinde

Standard 9

When I sat down to write on this subject I was confused, because I didn't know who my ideal person was. Other people say Mahatma Gandhi, Pandit Nehru and Bhagat Singh should be your ideal persons. These great people are our ideals, but I don't know anything about them to call them my ideal persons. Who impresses me? I always want to be like whom? When I think about these things, I come to realize that my grandmother is my ideal persons. I will tell you why my grandmother is my ideal person.

When my grandmother got married she was only twelve years old and my grandfather was thirty years old. My grandfather worked in a handloom factory. He had a job in Mumbai. My grandmother stayed alone in Tarale. My grandfather came to Tarale every four to five months.

When my grandmother was 18 yeas old, she had her first son. By 1962 she had four children. That year Koyana had a dangerous earthquake. My grandmother and grandfather lost their home in that earthquake. Then they came to Phaltan.

When they came to Phaltan my father was born. My grandpa lost his job. He sat at home. At that time my grandma worked in other people's houses. She washed their clothes and dishes. When they gave something to eat to my grandma, she brought it home and gave it to her children. They had no food in the house. My two aunts died without food. But my grandmother had patience. She was strong.

"My wife works in others' houses, but I can't." This thought was all the time in my grandpa's mind. He took to drink. Slowly he started drinking every day and giving trouble in the house. This addiction reached a peak and also killed him. When my grandpa died my father was in the fourth standard. My grandmother's children were small and now she was

alone. But she was very strong. She never gave up. Her mother and father were very anxious about her. But they couldn't help her. She had six sons, but they were all small so she was helpless. Still she never failed in her work. She went to others' houses with her small children and did their work. When she did their work, people gave her old clothes and left-over food and money.

She saved the money and taught her children. Her children are very responsible. They helped their mother in her work. My grandmother taught my father how to face any problem, to be satisfied with what one had, and to spend only as much as one earned. That is why my father and uncles could come this far. She says, " Try, try but don't cry."

She is still the same strong person in any situation. Two or three years ago two of my uncles died. All my other uncles were very sad. They were depressed and had lost heart in living. My grandmother said to all my uncles, "Everyone who is born has to die one day. That is the law of nature."

When I heard it I couldn't believe my 75 year old grandmother saying all this while my father and uncles were depressed. How could my grandmother say all this? She was strong.

She is always busy. She always wakes up at four o' clock in the morning. She helps my mother in cooking. She never eats lunch without working. It is her habit. My grandma is great. I always want to be like her. She taught me how to face any problem, so I am proud to say that my ideal person is my grandmother.

I will say that events can change people but there are very few people who can change events.

One day my grandmother sat on the door steps. One old woman came near my grandma and asked her, "Where do you live?" When my grandma showed her our house, the woman just stood rooted to the spot, because long ago my grandmother used to go that woman's house to work. The way that woman had seen my grandmother working she had never imagined that one day my grandma would live in a big house and own a big bakery business. The credit for all this goes to my grandmother and to her alone.

■

# Sketches

## Standard 8

A farmer was irrigating his bajra crop and some children were playing in the water. Those people work on our farm. Some children were playing in the irrigation channel. The sun was setting. The road was curved. The birds were going back home.


**Priyanka Lokhande**

In India we see two types of ants-- black and red. Ants have three groups-- the queen, males, and workers. The queen produces eggs. The males fertilize the eggs and the workers bring and store food. In the rainy season ants do not come out of the anthill because they would die in the water.

**Priyanka Phalke**

In the evening I saw many kinds of insects and birds in our yard. There was a butterfly. It was colorful and very beautiful. I saw mushrooms. There were many ants and flies. I saw a wasp.

**Anand Joshi**



I was going home. The market was full of people. I reached home. My mother was teaching her class. My grandmother was making tea. I went on the terrace. The sky was cloudy. It was drizzling. It was hot. The crows were sitting on the pipe. The dogs were sitting under the balcony. All the houses and buildings were wet. The mountains could not be seen. People were walking with umbrellas. A drunk man was staggering around and shouting. The dog was barking. The shopkeepers were waiting for customers. The birds were returning to the nests.



**Nikhil Hendre**



The atmosphere is very cool. There is a frog. There are some mushrooms. There is grass everywhere. There is a slug. It is very happy. The birds are flying. There are flowers everywhere. The frog is happy because it sees an insect. The wind is blowing and the sky is cloudy.

**Shraddha Kirkire**

# My Hobby

Dipali Khedkar

Standard 9

My hobby is drawing. I draw pictures and colour them. I also make greetings for Diwali, Makar Sankranti and New Year.

When I was in the first standard I drew zigzag lines on my slate. I showed it to my family members. They laughed at my pictures and said, "What is this?" They could not see what it was, but I liked my drawing. So I decided to become an artist.



When I was in the eighth standard I participated in the *Sakal* drawing competition. I got a certificate and also some money.

Then I appeared for the Elementary grade exam. I got 'B' grade. I was very happy. In the ninth standard I sat for the Intermediate grade exam. Wasimdada taught Rohit and me. Our practice was very good. I hope to get an 'A' grade now. ■

***[ Editor's note: Dipali did get an A grade in the Intermediate exam.]***

# My Unforgettable Moment at School

Kranti Katkar

Standard 9

I have many unforgettable moments which are either good or bad. That is because sometimes I laughed a lot and sometimes I cried for a long time.

But this moment is very different from all the others because first I cried a lot and when I remember it now I laugh a lot.

That day was Wednesday. Uniform was compulsory on three days- - Monday, Wednesday and Friday.

When I woke up I thought that it was Tuesday. I filled the school bag with all the books and notebooks according to Tuesday's timetable. I wore a civil dress and went to school. I was late for some reason.

Prayer had started. My sister and brother had gone early. I went into the hall and sat down. I saw all the students in uniform. I was so worried. I started to cry and after the prayers were over I went to my sister and started to cry. My eyes were red and face was swollen. I told Pallutai, "Ashatai may send me home because of this". I was crying, "I cannot go home" because my home is far away from school.

Pallutai started to laugh and told me to keep quiet and not to worry.

She went to Ashatai and told her that Kranti thought today was Tuesday so she is wearing a civil dress and not a uniform.

Ashatai knows our home is far away from school. So she did not get angry with me. Only she said that this should not happen again.

When I went home Pallutai told this matter to everyone and everbody in my family started to laugh. I was embarrassed at first and then I also started to laugh. This is my unforgettable moment. I always remember it and my family also remembers it.

# The Rainy Night

Gourav Bhattad

Standard 9

We entered the Mruga Nakstra on 7th June. June 5th was an unbelievable day. The whole day the scorching sun baked the earth. There was no trace of rain or even clouds.

But at night the darkness became darker. The clouds gathered from all directions. At midnight suddenly the loud sound of rain woke me up. I was frightened because I did not know what the sound was. It was a mysterious night. There was darkness everywhere.

Only the light of the lightning cut that darkness. There was silence all around. Only the sound of thunder broke that silence. It was very loud. The water fell from the roof in a splash. Every- where around me I saw only water and water. There was lightning all around me. The lightning looked very dangerous. It took on very different shapes. Sometimes it was like a streak and sometimes like a barbed wire. The wind was making a frightening noise. Water collected everywhere. The weather became cold. The temperature dropped. I saw the nocturnal dance of the rain. It was an unforgettable experience. I tried to get some sleep because I don't get any sleep when a storm breaks. I was very tired. But I could not get any sleep because of the lightning and wind. At last I went to sleep. When I woke up the next day I saw that nature had changed. Everything was green. The sky was cloudless. There was a beautiful sunrise. The change in nature was amazing. That was because of the wonderful rainy night.

■

# परिसर भेटी



कमलेशच्या शेतात झाडावर चढलेली मुले



माळजाई परिसरात पारंब्यांना लटकणारी मुले

## बालहक्कः वार्षिक प्रकल्प २००४-२००५
## काही क्षणचित्रे



कचरा डेपोवरील कचरा गोळा करणा-या मुलांची मुलाखत



नगर पालिकेच्या शाळेतील मुलांची मुलाखत